## अंतरंग


ग्रीनफिल्ड महामार्गाला सरकारचा हिरवा कंदील/२

उरणमध्ये मलेरिया, डेंग्युचा प्रसार; दक्षतेचे आवाहन/३

थाई किक बॉक्सिंग स्पर्धेत रायगडला अजिंक्यपद/८



रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३५१
www.ramprahar.com

रविवार, ९ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



।। विद्या विनयेन शोभते ।।
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
CHANGU KANA THAKUR
Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous)
Dr. C. D. Deshmukh Centre for Administrative Services
७५,००० पदांची भरती
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
तलाठी मार्गदर्शन शिबीर आणि
ग्रामसेवक
कृषिसेवक
आरोग्यसेवक
पोलीस भरती
जिल्हापरिषदेमधील
व इतर सरळसेवा
CONTACT: 9833177551/9223555779 | WEBSITE: www.ckthakurcollege.net


# महिन्याच्या पहिल्या सोमवारी महावितरणचा लोकशाही दिन

## पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत निर्णय

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यात महिन्याच्या पहिल्या सोमवारी महावितरणतर्फे लोकशाही दिन साजरा करण्यात येणार असून त्यामध्ये नागरिकांच्या तक्रारीचे निवारण करण्याचा घेतलेला निर्णय चांगला आहे. त्याची योग्य प्रकारे अमलबजावणी व्हावी, असे निर्देश भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. ८) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अधिकार्‍यांसमवेत झालेल्या बैठकीत सांगितले.






पनवेल तालुक्यातील विद्युत पुरवठ्यासंदर्भातील वाढत्या तक्रारी लक्षात घेत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार शनिवारी खांदा कॉलनी येथील श्रीकृपा हॉल येथे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अधीक्षक अभियंता शिवाजीराव गायकवाड, कार्यकारी अभियंता सतीश सरोदे व इतर अधिकार्‍यांसमवेत बैठक झाली. या वेळी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, पनवेल मनपा माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, बबन मुकादम, मनोहर म्हात्रे, मनोज भुजबळ, तेजस कांडपिळे, समीर ठाकूर, अजय बहिरा, मुकीद काझी, हरेश केणी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, नेत्रा पाटील, भाजप शहर सरचिटणीस अमरीश मोकल, प्रमोद भिंगारकर, भीमराव पोवार, खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल उपस्थित होते.

वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, वाढीव देयके, मीटर बदलताना घेतले जाणारे पैसे, कर्मचार्‍यांची उद्धट उत्तरे, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर फोन न उचलणे अशा विविध समस्यांच्या अनुषंगाने बैठकीत अनेकांनी तक्रारी केल्या. महावितरणच्या कार्यालयात सीसीटीव्ही बसवा म्हणजे कोण खोटे बोलते ते समजेल असेही सूचवण्यात आले. माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी वीज खंडित झाल्यावर रात्री आम्ही नागरिकांबरोबर कार्यालयात जातो, तर कर्मचारी नसतात, पण तोडफोड होईल म्हणून पोलिसांना फोन करून बोलावून घेतात नाहीतर आम्ही त्यांना दाखवून दिले असते, असे बोलून दाखवले. (पान २ वर..)

> **टोल फ्री नंबरवर किती वेळ वाट पहावी याबाबत निश्चित कालावधी ठरवावा. लोकशाही दिनी आलेल्या तक्रारींची नोंद करून किती सोडवल्या याची माहिती उपलब्ध करून द्यावी. ज्या ठिकाणी जिल्हा नियोजनकडून आर्थिक मदत हवी असेल, तेथे मी त्यांना मदत करीन, पण वीज ग्राहकांना होणारा मनस्ताप दूर करण्यासाठी वीज वितरण कंपनीने स्वतःच्या सोयीने काम न करता जबाबदारीने काम करावे.**
>
> **–आमदार प्रशांत ठाकूर, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष**

गडचिरोलीत 'शासन आपल्या दारी'

# ट्रीपल इंजिन सरकार राज्याला विकासाकडे नेईल -मुख्यमंत्री

**गडचिरोली : प्रतिनिधी**

राज्याला विकासाकडे घेऊन जाणारे सुशासन भाजप–शिवसेना सरकारने आणले. आता अजित पवार यांचीही साथ लाभली आहे. मेहनती आणि कष्टकरी माणसाला जेव्हा दुय्यम स्थान दिले जाते, त्याच्यावर अन्याय होतो, त्या वेळी अजित पवार यांच्यासारख्या नेत्याकडून बंडाच्या घटना घडतात. आता त्यांनी आपल्याला साथ दिल्यामुळे हे ट्रीपल इंजिन सरकार राज्याला विकासाकडे घेऊन जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोली येथे व्यक्त केला.




### अजित पवार आमचे नवे साथी : उपमुख्यमंत्री फडणवीस

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी गेल्या वर्षभरापासून काम करीत होतो. आता अजित पवार आले आहेत. आम्ही एक त्रिशूळ तयार केले आहे. हे विकासाचे त्रिशूळ आहे. तीन दिवसांपूर्वी आपल्या राष्ट्रपतीदेखील येथे आल्या होत्या. राष्ट्रपती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोघे देशाला दिशा देण्याचे काम करीत आहेत. याच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू गडचिरोलीत आल्या होत्या, हे आपले सौभाग्य आहे.

येथील एमआयडीसी मैदानावर शनिवारी (दि. ८) शासन आपल्या दारी अभियानांतर्गत विविध योजनांचा लाभ सामान्यांना देण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी उपमुख्यमंत्री व पालकमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कॅबिनेट मंत्री धर्मरावबाबा आत्राम, खासदार अशोक नेते, आमदार डॉ. देवराव होळी, आमदार कृष्णा गजबे, आमदार सुधाकर आडबले, पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, जिल्हाधिकारी संजय मीणा, उपमहानिरीक्षक संदीप पाटील, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी कुमार आशीर्वाद, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त डॉ. सचिन मडावी, भाजप जिल्हाध्यक्ष किशन नागदेवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर, माजी जि. प. अध्यक्ष भाग्यश्री आत्राम आदींची उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, गडचिरोलीवर सर्वांचे विशेष लक्ष असल्याचा आवर्जून उल्लेख केला. गडचिरोलीत ११ लाखांपैकी सात लाख लोकांना विविध प्रमाणपत्रे, योजनांचा लाभ घरपोहोच देण्याचे काम केले. या माध्यमातून ६०१ कोटींच्या योजना सामान्यांना दिल्या असल्याचे सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, केंद्र व राज्य सरकार एका विचाराचे असेल तर निधी व विविध विकासयोजना आणता येतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नऊ वर्षांत देशात मोठ्या प्रमाणात कामे झाली. या विकासाला पाठिंबा द्यावा म्हणून भाजप व शिवसेनेसोबत आलो आहोत. याबद्दल कोणी काही म्हणत असेल तर महत्त्व देऊ नका. भाजप, शिवसेना व राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांसोबत रहावे.

## निवडक

### लाचखोर पोलिसाला अटक

**नाशिक :** नाशिक रोड पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक गणपत काकड यांस १५ हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तक्रारदार आणि त्यांच्या पत्नीविरोधात दाखल गुन्ह्याच्या तपासात मदत करण्यासाठी गणपत काकड यांनी २५ हजारांची मागणी केली होती. तडजोडीअंती १५ हजारांची लाच स्वीकारताना अटक करण्यात आली.

### रेल्वे प्रवास होणार स्वस्त

**मुंबई :** वंदे भारतसह सर्व गाड्यांचे एसी चेअर कार आणि एक्झिक्युटिव्ह क्लास आणि विस्टाडोम कोचचे भाडे २५ टक्क्यांपर्यंत कमी केले जाणार आहे, अशी माहिती रेल्वे बोर्डाने दिली आहे. ट्रेनमध्ये जास्तीत जास्त जागांचे आरक्षण व्हावे, यासाठी ही कपात केली जाणार आहे.

**रायगडचे पर्जन्यमान**

**२४ तासांतील पाऊस : ६६.०५ मिमी**
**एकूण पाऊस : ८७१.2 मिमी**

# कशेडी घाटात दोन अपघातांमध्ये एकाचा मृत्यू; वाहनांचेही नुकसान



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कशेडी घाटामध्ये शुक्रवारी (दि. ७) मध्यरात्रीच्या सुमारास दोन वेगवेगळ्या अपघातामध्ये एकाचा मृत्यू झाला असून वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

खेड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील पोलादपूर तालुक्यात असलेल्या महामार्ग पोलीस केंद्र कशेडीच्या हद्दीमध्ये शुक्रवारी रात्री ९.१० वा. च्या दरम्यान महामार्गावर चालक कैलास मनोहर वनवे (वय ४९, रा. बारामती, जि. पुणे) यांच्या हुंदाई आय ट्वेन्टी कारला (एमएच ४२ बीई ४४४९) मागून येणार्‍या टँकर (डीडी ०१ जे ९६६०)ने धडक दिल्याने कार रस्त्याच्या डाव्या बाजूस नाल्यामध्ये गेली. अपघातात कारमधील प्रवासी किरकोळ जखमी झाले नसून कारचे मात्र मोठे नुकसान झाले आहे.

दुसरा अपघात बारामती पुणे ते दापोली मार्गावर क्रेटा कार (एमएच १२ आरवाय८८८८) वरील चालक सुयोग जयवंत कुलकर्णी (वय ३१, रा. बारामती, जि. पुणे) यांनी टँकरला ओव्हरटेक करून पुढे जात असताना समोरून जाणारा ट्रक (एपी ०२ टीई ४८५८)ला समोरासमोर धडक दिली. अपघातामध्ये कारमध्ये मागे बसलेले दत्तात्रय शरद टेके (वय ४२, रा. माळेगाव बुद्रुक ता. बारामती, जि. पुणे) जखमी झाल्याने त्यांना तत्काळ ग्रामीण रुग्णालय येथे दाखल केले, मात्र डॉक्टरांनी दत्तात्रय टेके यांना मृत झाल्याचे घोषित केले.

अपघातातील वाहने क्रेनच्या सहाय्याने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# पोहायला गेलेल्या तरुणाचा बुडून मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील खारघरमधील खुटुक बांधण गावासमोरील तलावात मित्रांसह पोहण्यासाठी गेलेल्या एका तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. ८) घडली आहे. सुलेमान खान (वय १८) असे या तरुणाचे नाव आहे.

तळोजा फेज २ परिसरात राहणारा सुलेमान खान शनिवारी आपले दोन मित्र दीपक कुमार, अरमान खानसह खारघर सेक्टर–३६मधील खुटुक बांधण गावासमोरील तलावात पोहण्यासाठी गेला होता. सुलेमानसोबत असलेले दोन्ही मित्र यातील कोणालाही पोहता येत नव्हते, तरीही तलावात पोहण्याचा आनंद घेत असताना खोल पाण्याचा अंदाज न आल्याने सुलेमानचा बुडून मृत्यू झाला, तर त्याच्यासोबत असलेले दोन मित्र बचावले. ही घटना दुपारी २ वा.च्या सुमारास घडली. मित्रांनी याबाबतची माहिती सुलेमानच्या घरच्यांना दिली. घरच्यांनी खारघर पोलीस ठाण्यात झालेली घटना सांगितली. त्यानंतर पोलिसांनी अग्निशमन दलाच्या मदतीने सुलेमानचा शोध सुरू केला. अग्निशमन दलाच्या बचाव कार्याने दोन तास अथक प्रयत्नाने मृतदेह शोधून बाहेर काढला.

# सत्तासंघर्षावर विधानसभा अध्यक्ष निर्णयाच्या दिशेने

## शिंदे आणि ठाकरे गटाच्या आमदारांना म्हणणे मांडण्यासाठी सात दिवसांची मुदत

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना शिंदे गटाच्या १६ आमदारांविरुद्धच्या अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर लवकरच निर्णय घेणार आहेत. त्यातच आता शिवसेनेच्या ४० आमदार आणि ठाकरे गटाच्या १४ आमदारांना अपात्रतेसंदर्भात म्हणणे मांडण्यासाठी नोटीस जारी करण्यात आली आहे. आमदारांना म्हणणे मांडण्यासाठी सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे.



अपात्रतेविरोधातील कारवाई टाळण्यासाठी आमदारांना सर्व पुरावे सादर करावे लागणार आहेत. निवडणूक आयोगाकडून विधीमंडळाला शिवसेनेच्या घटनेची प्रत प्राप्त झाली आहे. शिवसेनेच्या घटनेचा अभ्यास करून विधानसभा अध्यक्ष डॉ. राहुल नार्वेकर लवकरच निर्णय घेण्याची शक्यता आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आमदारांच्या अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्षांनी निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले आहेत. यामुळे आता नोटीस देऊन अध्यक्ष राहुल नार्वेकर हे एकनाथ शिंदेंसह इतर आमदारांबाबत कार्यवाहीला सुरुवात करणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर ९० दिवसांच्या विधानसभा अध्यक्षांना निर्णय घेण्यासाठी मुदत देण्यात आली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून शिवसेनेच्या घटनेची प्रत आपल्याला मिळाली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ शिवसेना आमदारांविरुद्धच्या अपात्रतेच्या याचिकांवर लवकरच सुनावणी सुरू होणार आहे, असे राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी सांगितले होते. राहुल नार्वेकर यांनी निवडणूक आयोगाकडे शिवसेनेच्या घटनेची प्रत मागितली होती. आता आम्ही सुनावणी सुरू करू, असे त्यांनी म्हटले आहे.

## अभिनंदन..!



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उलवे नोड यांच्यासह संलग्न असलेल्या रायझर्स अकॅडमीतील केतना कुंदन शेवेकर हिने नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय गोळाफेक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावून बालेवाडी पुणे येथील राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केतना शेवेकर आणि तिचे प्रशिक्षक प्रशांत पाटील यांचे अभिनंदन केले, तसेच पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.**

# मुंबई पोलिसांना मेसेज पाठवणार्‍याला गोव्यातून अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई पोलिसांना रेल्वेबाबत संशयास्पद कॉल आल्यानंतर राज्यभरातील रेल्वे स्थानकांवर हाय अलर्ट घोषित करण्यात आला. त्या धर्तीवर छत्रपती संभाजीनगरसह राज्यभरातील रेल्वेस्थानकांवरही रेल्वे पोलीस व लोहमार्ग पोलिसांनी कडेकोट तपासणी करून दिवसभर गस्त घालीत होते.

दोन दिवसांपूर्वी मुंबई पोलिसांना 'रेल्वे पॅक होगा, हम हमारा काम करेंगे' अशा आशयाचा मेसेज रात्री प्राप्त झाला होता. या अनुषंगाने शुक्रवारी दिवसभर संशयास्पद हालचाली करणारे, नाहक फिरणार्‍यांची चौकशी करण्यात आली. धमकीचा मेसेज मिळताच मुंबई पोलिसांनी मोबाईल फोनवरून आरोपीचा शोध घेतला, तसेच धमकी देणारा हा गोव्यात असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. त्यामुळे शुक्रवारी भल्या सकाळी धमकी देणार्‍या आरोपीलाही बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

# राज्यातील १३ ऐतिहासिक शाळांचा होणार कायापालट

## विकासासाठी १४ कोटी ३० लाख रुपयांचा निधी

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान देणार्‍या आणि स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणार्‍या महात्मा जोतिबा फुले यांच्यापासून ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जन्मगावातील शाळांचा विकास करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील १३ ऐतिहासिक शाळांचा कायापालट होणार आहे. त्यासाठी सरकाराने १४ कोटी ३० लाख रुपयांचा निधी जाहीर केला आहे.

पुरोगामी महाराष्ट्राची जडणघडणीत महापुरूषांचे मोठे योगदान आहे. तसेच महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या महापुरूषांच्या शाळांचा विकास करण्याचा हा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातील महापुरुषांशी संबंधित १३ शाळांच्या विकासासाठी तब्बल १४ कोटी ३० लाख रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे.



अहमदनगरच्या चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, अमरावतीमधील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, शिक्षण महर्षी कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख, कोल्हापूरची राजर्षी शाहू महाराज आणि नाशिकमधील कुसुमाग्रजांची शाळा, पुण्यातील महात्मा जोतिबा फुले शाळा, तसेच रत्नागिरीतील महर्षी धोंडो केशव कर्वे व साने गुरुजी शाळा, सांगलीतील लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व क्रांतिसिंह नाना पाटील शाळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले शाळांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. या शाळांमध्ये महापुरुषांचे कार्य सांगणारे संग्रहालय, शाळेचा दर्जा, प्रयोगशाळा यांसारख्या सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

### इमारतीसह उद्यान व पायाभूत सुविधा

अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार बनकर यांनी कुसुमाग्रजांची पहिली ते चौथीपर्यत शिक्षण झालेल्या प्राथमिक विद्यामंदिराच्या विकासासाठी निधी मिळण्याची मागणी केली. त्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी एक कोटी रुपयांचा विकासनिधी देण्याची घोषणा करण्यात आली. पिंपळगावच्या प्राथमिक शाळेच कष्टकर्‍यांची मुले शिक्षण घेतात. सध्या जुनी इमारत मोडकळीस आली असून धोकादायक स्थितीत आहे. निधीची घोषणा झाल्याने इमारतीसह उद्यान व पायाभूत सुविधा शाळेच्या प्रांगणात उभारता येणार आहे.

# ग्रीनफिल्ड महामार्गाला हिरवा कंदील

## पेणमधील बलवली ते सिंधुदुर्गमधील पत्रादेवीदरम्यान द्रुतगती महामार्ग

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतून कोकणात, सिंधुदुर्गात अवघ्या काही तासांत पोहचता यावे यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घेतलेल्या मुंबई-सिंधुदुर्ग कोकण ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्ग प्रकल्पाच्या आराखड्यास राज्य सरकारने मंजुरी दिली.

मंजुरी मिळाल्याने आता या प्रकल्पासाठी भूसंपादनास सुरुवात करण्यात येणार आहे. अंतिम मंजूर आराखड्यानुसार पेणमधील बलवली ते सिंधुदुर्गमधील पत्रादेवीदरम्यान हा महामार्ग उभारण्यात येणार आहे. हा महामार्ग एकूण ३८८.४५ किमी लांबीचा असणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम अनेक वर्षांपासून रखडले असून नागरिकांना मुंबईतून कोकणात जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन एमएसआरडीसीने समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर मुंबई-सिंधुदुर्ग कोकण ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार २०२१मध्ये या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले होते.

आराखड्याचे काम पूर्ण करून तो राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. या आराखड्यास नुकतीच मंजुरी देण्यात आली असून यासंबंधीचा शासन निर्णय गुरुवारी जारी करण्यात आला.

आराखड्यास मंजुरी मिळाल्याने आता लवकरच एमएसआरडीसी या महामार्गासाठी भूसंपादनास सुरुवात करेल, अशी माहिती एमएसआरडीसीचे सहव्यवस्थापकीय संचालक संजय यादव यांनी दिली.

भूसंपादन आणि निधी उपलब्ध झाल्यास भविष्यात महामार्गाच्या बांधकामासाठी निविदा मागवून कामास सुरुवात करण्यात येईल. ही प्रक्रिया बरीच मोठी असल्याने प्रत्यक्ष काम सुरू होण्यास आणखी काही काळ वाट पहावी लागणार आहे, मात्र हा महामार्ग तयार झाल्यास मुंबई-कोकण प्रवास सुकर आणि वेगवान होणार आहे.

एकूण ३८८.४५ किमी लांबीच्या या महामार्गाचे चार टप्प्यांत काम करण्यात येणार आहे. त्यानुसार पहिला टप्पा पेण, बलवली गाव ते रायगड (रत्नागिरी जिल्ह्याची सीमा) असा ९५.४० किमीचा असणार आहे, तर ६९.३९ किमीचा रायगड (रत्नागिरी सीमा) ते गुहागर, चिपळूण असा दुसरा टप्पा असेल. तिसऱ्या टप्प्यात गुहागर ते रत्नागिरी (सिंधुदुर्ग सीमा) असा १२२.८१ किमी लांबीचा महामार्ग बांधण्यात येणार आहे. तर शेवटचा टप्पा हा १००.८४ किमीचा असणार असून तो रत्नागिरी (सिंधुदुर्ग सीमा) ते पत्रादेवी (महाराष्ट्र आणि गोवा सीमा) असा असणार आहे. त्यामुळे प्रवास सुखकर होणार आहे.



**वैशिष्ट्ये :**

- *प्रवेश नियंत्रित असा हा सहापदरी मार्ग असेल.*
- *महामार्गाची रचना ताशी १०० किमी वेग अशी असणार आहे.*
- *कोकण ग्रीनफिल्ड महामार्ग पेणपासून सुरू होणार असला तरी मुंबई पारबंदर प्रकल्पावरून (शिवडी-न्हावाशेवा सागरी मार्ग) महामार्गावर पोहचता येणार आहे.*
- *या प्रकल्पामुळे मुंबई-सिंधुदुर्ग प्रवास काही तासांत करता येणार*

## कळंबोलीतील महिलेस घातला ऑनलाईन गंडा

### बिजनेस ग्रुपवर टास्क करण्यास सांगून सव्वा तीन लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

बिजनेस ग्रुपवर वेगवेगळे टास्क करण्यास सांगून वेगवेगळ्या बँक खात्यात पैसे भरावयास भाग पाडून तीन लाख नऊ हजार ९७ रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात फसवणूक आणि माहिती तंत्रज्ञान अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कळंबोली सेक्टर १ येथील ज्योती कुंभार यांना व्हॉट्सअॅपवर 'नमस्कार' असा संदेश आला. त्यांनी विचारले असता समोरून नाव प्रतिभा मोहन असे सांगून त्या एचआर. डिपार्टमेंट सिक्रेन्स कम्युनिकेशन प्रायव्हेट लिमिटेडमध्ये काम करीत असल्याचे सांगितले व त्यांना १५०० ते २५०० रुपये दिवसाला मिळतील, अशी ऑफर दिली.

त्यांनी लिंक पाठवली त्या लिंकवर क्लिक केल्यानंतर त्यांनी टेलिग्राम आयडी दिला. त्यानंतर टास्कचे पैसे देण्यासाठी खाते नंबर दिला. त्यानंतर १५० रुपये खात्यावर पाठवण्यात आले व दिवसाला २५ टास्क पूर्ण केले तर नवीन मित्र अॅड करू शकता व बेसिक टास्कसाठी प्रत्येकी पन्नास रुपये मिळतील, असे सांगितले. त्यांना ग्रुपवर वेगवेगळे टास्क येऊ लागले ते टास्क पूर्ण करून डिजिटल इंडिया ग्रुपवर पाठवू लागल्या. त्यानंतर टास्कचे एक हजार रुपये त्यांच्या बँकेच्या खात्यात पाठवण्यात आले. त्यानंतर १३०० रुपये समोरील व्यक्तीने पाठवले.

समोरील व्यक्तीने दिलेल्या खात्यावर ६०० रुपये भरण्यास सांगितले असता कुंभार यांनी सहाशे रुपये पाठवले. त्यानंतर दहा हजार रुपयांचा टास्क दिला. त्यांनी १० हजार रुपये पाठवले. ९८ हजार ६९९ रुपये भरण्यास सांगितले. असे एकूण तीन लाख नऊ हजार ९७ रुपये कुंभार यांनी भरले. त्यानंतर फसवणूक झाल्याचे उघड झाले.

## दलित पँथरचा आज सुवर्ण महोत्सव

**मुंबई : प्रतिनिधी**

दलित पँथरचा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन रविवारी (दि. ९) असुन त्यानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन भारतरत्न लता मंगेशकर सभागृह मीरा रोड येथे करण्यात आले आहे.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात दलित पँथरचा सुवर्ण महोत्सव राज्यभर गेली वर्षभर साजरा होत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रविवारी सायंकाळी ५ वाजता मीरा रोड येथे दलित पँथर सुवर्ण महोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत अर्जुन डांगळे, माजी मंत्री रिपाइंचे प्रवक्ते अविनाश महातेकर, दिलीप जगताप, पत्रकार दिवाकर शेजवळ, तसेच रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजा सरवदे, गौतम सोनवणे, सुरेश बारशिंग, दयाल बहादुर, सिध्दार्थ कासारे, बाळाराम गायकवाड आदी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन मिरा-भाईंदर रिपाइंचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र शेरेकर, उत्तर मुंबईचे जिल्हाध्यक्ष रमेश गायकवाड यांनी केले आहे. या कार्यक्रमास रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रिपाइंतर्फे करण्यात आले आहे.

## साताऱ्यात महिलेवर सामुहिक बलात्कार; संशयित ताब्यात

**सातारा : प्रतिनिधी**

फलटण-शिंगणापूर मार्गावरील सोनवडी बुद्रुक (ता. फलटण) येथे एका कोळसा भट्टीत काम करणाऱ्या आदिवासी महिलेवर सुमारे १५ दिवसांपूर्वी भट्टीमालकासह अन्य अनोळखींनी सामुहिक अत्याचार केल्याचा आरोप पीडित महिलेने केला आहे. या प्रकारामुळे फलटण तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांनी या प्रकरणातील संशयित भट्टीमालक बाळू शेख (रा. सोनवडी बु., ता. फलटण) यास ताब्यात घेतले आहे.




याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी, की सोनवडी बु. येथे बाळू शेख याची लाकडापासून कोळसा बनविण्याची भट्टी आहे. या भट्टीवर कातकरी समाजातील पुरुष व महिला कामगार आहेत. या कामगारांच्या खोपी या ठिकाणीच असून, तेथेच हे कामगार वास्तव्यास आहेत. जून महिन्यात संबंधित महिलेवर तिच्या खोपीत रात्रीच्या सुमारास त्या महिलेच्या पतीस बाहेर काढून बाळू शेखसह अन्य ११ जणांनी सामुहिक अत्याचार केल्याचा दावा तिने केला आहे. या प्रकारानंतर ती महिला पती व मुलांसह रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील गावात जाण्यात यशस्वी ठरली.

यानंतर तेथे ती आदिवासी समाजासाठी कार्यरत असलेल्या श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या संपर्कात आली. या घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांनी पीडित महिलेस संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांच्याकडे नेले. संघटनेच्या माध्यमातून तिला विरार (मुंबई) येथील मांडवी पोलीस ठाण्यात नेण्यात आले. त्यानंतर तेथे पीडितेचा जबाब नोंदविण्यात आला.

## 'रोटरी'तर्फे खारघरमध्ये वृक्षारोपण सोहळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनतर्फे खारघर सेक्टर ३६ येथे शनिवारी (दि. ८) हारमनी शाळेत वृक्षारोपणाचा सोहळा राबविण्यात आले. साधारण ५० वेगवेगळ्या फळांचे, फुलांचे व इतर झाडे लावण्यात आले.

या कार्यक्रमात शाळेचे प्रिन्सिपल प्रणय दुबे, शिक्षक, विद्यार्थी, पालक व रोटरी क्लब अध्यक्ष अनूप गुप्ता, सेक्रेटरी डॉ. रवी किरण, प्रोजेक्ट डायरेक्टर शैलेश पटेल व इतर रोटेरियन आणि त्यांचे कुटुंब उपस्थित होते. प्रत्येकाच्या हस्ते एक ते दोन वृक्ष लावण्यात आले.

प्रिन्सिपल प्रणय दुबे यांनी हमी दिली की, प्रत्येक वृक्ष जगतिल याची ते स्वत: काळजी घेतील. रोटरी क्लब अध्यक्ष अनूप गुप्ता यांनी सांगितले की, असा अजून चार ते पाच वृक्षारोपण सोहळा आम्ही एक ते दोन महिन्यात करणार आहोत व पर्यावरण संतुलित ठेवण्यात एक छोटासा हातभार आम्ही दरवर्षी करीत आले आहे आणि यापुढेही करत राहू.




## ओवे गावालगत अडीच लाखांचा गुटखा जप्त

### झोपडीवर छापा मारून एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने खारघरमधील ओवे गावालगत असलेल्या एका झोपडीवर छापा मारून सुमारे अडीच लाख रुपये किमतीचा गुटखा व इतर तंबाखूजन्य पदार्थांचा साठा तसेच सव्वादोन लाखांची रोख रक्कम जप्त केली. पोलिसांनी गुटख्याचा साठा बाळगणाऱ्या व्यक्तीला अटक करून त्याने ज्याच्याकडून हा गुटखा आणला त्याचा पोलीस शोध घेत आहेत.

खारघरमधील ओवे गावातील अली पब्लिक स्कूललगत असलेल्या झोपडीमध्ये एका व्यक्तीने गुटख्याचा साठा विक्रीसाठी आणल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चौधरी यांनी दिलेल्या कारवाईच्या आदेशानुसार, पोलीस उपनिरीक्षक कुलदीप मोरे व त्यांच्या पथकाने ओवे गावातील संशयित झोपडीवर छापा मारला. त्यानंतर पथकाने झोपडीमधील मो. गफुर अन्सारी (वय ३८) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडील गोण्यांची तपासणी केली. या वेळी सुमारे अडीच लाख रुपये किमतीचा पानमसाला व तंबाखूचा साठा आढळून आला. तसेच अन्सारीकडे दोन लाख १६ हजारांची रक्कमसुद्धा सापडली.

या वेळी पोलीस चौकशीत त्याने हा गुटखा मुंब्रा येथील महफुज नावाच्या व्यक्तीकडून आणल्याचे सांगितले, तसेच त्याच्याकडे सापडलेली रक्कम त्याने गुटखा विक्रीतून मिळवली असून, ती पानमसाला व तंबाखू विकत घेण्याकरता ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर पथकाने अन्सारीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. तसेच त्याच्याकडून गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा व रोख रक्कम जप्त करण्यात आला आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. ८) माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी कार्यशाळेचे आयोजन केले होते.



या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश प्रकल्पाविषयी मार्गदर्शन करणे तसेच मार्केटमध्ये असणारी नवनवीन माहिती व तंत्रज्ञान याविषयी माहिती देणे हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी माहिती व तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना या कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागातील प्राध्यापिका स्नेहा लोखंडे यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रकल्पाविषयी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या शंकांचे निरसन केले.

या कार्यशाळेचे आयोजन प्रा. मीनल मांडवे विभाग प्रमुख माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी केले तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. राजश्री म्हात्रे यांनी सहकार्य केले.

## कसळखंड विसर्जन घाटाचे सुशोभीकरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कसळखंड ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच माधुरी अनिल पाटील यांनी थेट सरपंच भूषविल्यापासून परिसरातील समस्यांना अधिक प्राधान्य दिले आहे. कसळखंड, शिवाजीनगर, आष्टे, भाताण आदिवासीवाडी, अरीवली आदी गावांचा विकास करण्यासाठी तेथील समस्या जाणून परिसराचा कायापालट करण्याची कसब सुरू असल्याचे येथील नागरिकांतून बोलले जाते.

कसळखंड हद्दीतील तलावावर परिसरातील श्री गणेश विसर्जन करण्यात येते. या तळावावर आकर्षक विसर्जन घाट व त्याला सुशोभीकरण करण्यात आले. त्याचप्रमाणे या विसर्जन घाटावर १००पेक्षा अधिक वृक्षांची लागवड करून संवर्धनाची जबाबदारी कसळखंड ग्रामपंचायतीने स्विकारली आहे. सरपंच माधुरी अनिल पाटील यांच्या कार्याची सर्वत्र स्तुतीसुमने गायली जात असल्याचे चित्र दिसून येते.



## पान १ वरून

### महावितरणचा महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन

अनेक सोसायट्यांमध्ये असलेल्या डीपीमुळे अपघात त्यांची जागा बदलण्याची मागणी करूनही बदलल्या जात नाहीत. अशा प्रकारच्या अनेक तक्रारींचा पाढा माजी नगरसेवक आणि नागरिकांनी वाचला.

अधीक्षक अभियंता शिवाजीराव गायकवाड यांनी आपला फोन संबंधित कर्मचाऱ्याने न घेतल्यास आपली तक्रार फोन करून टोल फ्री नंबरवर नोंदवा म्हणजे त्याची दखल घेतली जाईल, असे सांगितले, पण टोल फ्री नंबरवर अनेक वेळा व्यस्त असतो. 'तुम्ही लाईनवर आहात', अशी टेप वाजत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी लोकांनी किती वेळ वाट पाहायची ते सांगा. त्यासाठी काही तरी उपाययोजना करण्यास सूचवले. मीटर बदलण्यासाठी तो जळला असल्यासच ६०० रुपये घेतले जातात. खराब असल्यास मोफत बदलून दिले जाते, असे स्पष्ट केले. केबलसाठी आम्ही ठेकेदार नेमले आहेत त्यांनी केबल आमच्याकडे नसल्यास पुरवायची असल्याचेही त्यांनी सांगितले. वीज ग्राहकांच्या तक्रारी पाहून त्यांनी महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन प्रत्येक विभागात सुरू करून तक्रारींचे निवारण करण्यात येईल, असे सांगितले.

***एखाद्या व्यक्तीने आपल्या घरातच व्यवसाय सुरू केला असल्यास त्याला ३०० युनिटपर्यंत घरगुती मीटर वापरता येईल. त्यापेक्षा जास्त युनिट पडत असल्यास त्याला व्यावसायिक मीटर घ्यावे लागेल. त्याचे लगेच मीटर काढून नेऊ नये, अशा सूचना त्यांनी या वेळी दिल्या.***

## महाबळेश्वर व पाचगणीला पाणीपुरवठा करणारा वेण्णा तलाव भरला

**वाई : प्रतिनिधी**


वाई महाबळेश्वर येथे सुरू असणाऱ्या संततधार पावसाने शनिवारी पहाटे वेण्णा लेक तलाव पूर्ण क्षमतेने भरला. सांडव्यावरून पाणी वाहू लागले. त्यामुळे महाबळेश्वर व पाचगणी नागरीकांचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

आता जुलै महिन्यात जोरदार वाऱ्यासह दाट धुके व पावसाची संततधार सुरू आहे. मुसळधार पावसाने महाबळेश्वर-पांचगणीकरांची तहान भागविणारा वेण्णा तलाव तुडुंब भरला. महाबळेश्वर व पांचगणी या दोन्ही पर्यटनस्थळांना पाणीपुरवठा केला जातो. वेण्णा तलाव पूर्ण भरल्याने समाधान व्यक्त होत आहे.

## दुखवटा

### महादेव काळू ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल तालुक्यातील छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांचे वडील तारा गावचे रहिवासी महादेव काळू ठाकूर यांचे शनिवारी (दि. ८) सकाळी वृद्धत्वाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर तारा गावातील स्मशानभूमीत सायंकाळी ६ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेसमयी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून आणि नात असा परिवार आहे.

## निवडक

### तरुणाची आत्महत्या

**पनवेल :** अज्ञात कारणावरून एका २१ तरुणाने राहत्या घरात आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद खान्देश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पनवेल तालुक्यातील विचुंबे येथील ज्ञानेश्वर माउली सोसायटी येथे राहणाऱ्या गौरव मनोज पवार (वय २१) याने अज्ञात कारणावरून हत्या घरामध्ये पिवळ्या रंगाच्या दोरीने छताच्या कडेला गळफास घेतला. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात केली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सुमित केंद्रे करीत आहेत.

### घरासमोरून रिक्षाची चोरी

**पनवेल :** घरासमोरील रस्त्यावर पार्क केलेली ऑटो रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिक्षाचालक नवनाथ खांडपेकर यांनी त्यांच्या मालकीची २५ हजार रुपये किमतीची आणि एमएच ४५ एसी ३५८० क्रमांकाची रिक्षा ते राहत असलेल्या पनवेल शहरातील अशोक बाग येथील अंकिता बिल्डींग समोर पार्क केलेली होती, मात्र अज्ञात चोरट्याने ती रिक्षा चोरून नेली. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वृषाली पवार करीत आहेत.

### मालगाडीच्या धडकेत अज्ञात व्यक्तीचा मृत्यू

**पनवेल :** येथून कर्जतकडे जाणाऱ्या रेल्वे मालगाडीच्या धडकेत ४५ वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस घेत आहेत. पनवेल-कर्जत रेल्वे रुळांमधून चालत जाणाऱ्या अज्ञात व्यक्तीला पनवेलकडून कर्जतकडे जाणाऱ्या मालगाडीची धडक बसल्याने तो गंभीर जखमी होऊन मृत्यू पावला आहे. मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध तालुका पोलीस घेत असून त्याच्याबद्दल किंवा त्याच्या नातेवाइकांबद्दल कोणास काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अडीच लाखांच्या लोखंडी साहित्याची चोरी

**पनवेल :** कुंपणाची जाळी उचकटून कंपनीमधील दोन लाख ५० हजार रुपयांच्या ४१ लोखंडी डोकाबिम या साहित्याची चोरी केल्याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौक येथे राहणारे सुनील देशपांडे हे बारवई गाव येथे पर्यवेक्षक म्हणून नोकरी करतात. त्यांच्या गोदामामध्ये बांधकामासंदर्भातील ६० डोकाबिम होते. काही दिवसानंतर ते गोडाऊनमध्ये गेले असता १८ डोकाबिम शिल्लक असल्याचे दिसून आले. या वेळी गोदामाची पाहणी केली असता कुंपणाची लोखंडी जाळी उचकटलेली त्यांना दिसली. त्यांनतर त्यांनी तालुका पोलीस ठाणे गाठत गुन्हा दाखल केला आहे.

# उरणमध्ये मलेरिया, डेंग्यूचा प्रसार

## लक्षणे दिसताच डॉक्टरांकडून उपचार घेण्याचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात ऊन-पाऊस असे चित्र सध्या जुलै महिन्यात पहावयास मिळत आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भावही वाढत आहे. अशा डासांच्या प्रादुर्भावामुळे मलेरिया व डेंग्यूचे रुग्ण आढळून येत आहेत. त्यामुळे लक्षणे दिसताच डॉक्टरांकडून उपचार घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

उरण तालुक्यात जुलै महिन्यात ऊन-पाऊस असे चित्र सध्या पहावयास मिळत आहे. त्यामुळे सखल भागात तसेच अडगळीच्या ठिकाणी पावसाचे पाणी साचून राहिल्याने डासाची उत्पत्ती होत आहे. त्यात रात्री अपरात्री सातत्याने



विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने डास रहिवाशांवर हल्ला चढवत आहेत. हे डास रहिवाशांना दंश करत असल्याने मलेरिया व डेंग्यूसारख्या आजाराची लक्षणे दिसू लागल्याने हे रुग्ण खासगी रुग्णालयात उपचार उपचारार्थ दाखल होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

आरोग्य विभागाच्या उरण तालुका आरोग्य विभागाने घटनेचे गांभीर्य ओळखून गावागावात डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी औषधांची फवारणी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप पाटील यांनी केली आहे. बोकडविरा ग्रामपंचायत हद्दीतील निकेतन पाटील यांना डेंग्यूची लागण झाल्याने रुग्ण पनवेल येथील लाईफ लाईन रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती मिळत आहे.

या कालावधीत किटकजन्य आजारामध्ये हिवताप, डेंग्यु, चिकनगुनिया असे आजार तसेच गॅस्टो व अतिसार असेही आजार होतात. यापैकी हिवतापाचा प्रसार नाफिलिस डासाच्या मादीपासून होतो. या डासांची उत्पत्ती पाण्याच्या टाक्या, कुलरचे पाणी, रांजण, माठ, स्वच्छ पाण्याची डबकी अशा साठलेल्या स्वच्छ पाण्यात होते. डास हिवताप रुग्णास चावतो, त्यावेळी रक्ताबरोबर हिवतापाचे जंतू डासाच्या पोटात जातात. असा दूषित डास निरोगी माणसास चावल्यास १० ते १२ दिवसांनी थंडी वाजून ताप येवून डासाव्दारे हिवतापाचा प्रसार होतो. त्यादृष्टीने नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

> **उरणमध्ये मलेरियाचे तीन तसेच डेंग्यूचे तीन रुग्ण आढळून आले आहेत. पावसाळ्यात ठिकठिकाणी आरोग्य विभागातर्फे फवारणी केली जात आहे. स्थानिक ग्रामपंचायत तसेच रहिवाशांनी परिसराची स्वच्छता करण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच साथीजन्य आजाराची लक्षणे दिसताच डॉक्टरांकडून उपचार करून घ्यावेत.**
>
> **– डॉ. राजेंद्र इटकरे**
> **उरण तालुका आरोग्य अधिकारी**



**पनवेल : किल्ले संवर्धन मोहिमेंतर्गत प्रळगडावर सुरू असणाऱ्या विविध विकासकामांची पाहणी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. या वेळी पळस्पे जि. प. युवा मोर्चा अध्यक्ष व भिंगार ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच योगेश लहाने, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, भिंगार ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुभाष पाटील, वारदोली ग्रामपंचायतीचे सदस्य सतीश पाटील, उद्योजक राजीव गुप्ते, वनखात्याचे भुजबळ, भाऊसाहे घाडगे, नायब तहसीलदार शेलार, पीडब्ल्यूडीचे बडबडे, सर्कल नाईक, योगेश पाटील आदी उपस्थित होते.**





**पनवेल : हभप नामदेव कृष्णा भागीत यांच्या १५व्या पुण्यस्मरण दिनी शनिवारी अजिवली येथे धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत स्व. भागीत यांना आदरांजली वाहिली. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, दशरथ म्हात्रे उपस्थित होते.**

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे विविध शाळांमध्ये वह्यावाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने विविध शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत पनवेल तालुक्यातील गुजराती शाळा क्रमांक ९ येथे शालेय वस्तूंचे वाटप या कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी (दि. ७) करण्यात आले होते. तसेच संजय जैन सामाजिक मंडळ यांच्या वतीने विद्यार्थ्यांना दूध वाटप करण्यात आले. या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे विविध क्षेत्रात कार्य सुरू आहे. त्यानुसार मंडळाच्या वतीने गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपास सुरुवात झाली आहे. त्याअंतर्गत पनवेल तालुक्यातील गुजराती शाळा क्रमांक ९ येथे शालेय वस्तूंचे वाटप या कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते.

या वेळी पनवेल शहर खजिनदार संजय जैन, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, सुनीत झुंजारराव, सपना पाटील, अभय देशमुख, प्रवीण मोरडाले, अरुण पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आणि पनवेल तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नावडे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष तथा मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. या वेळी उपाध्यक्ष राम पाटील, शत्रुघ्न खानावकर,अरुण गवळी, रमेश खानावकर, दशरथ म्हात्रे, सोहम साईके, प्रकाश म्हात्रे, बाळाराम पाटील, धनंजय म्हात्रे, देवानंद म्हात्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.**

# घरफोडीत तीन लाखांचा माल चोरी

## तळोजा वसाहतीमधील घटना

**पनवेल : वार्ताहर**

गावी गेलेल्या कुटुंबातील घरी कोणी नसल्याचे पाहून घरातील कडी-कोयंडा तोडून घरातील कपाटात असलेले रोख रक्कम व दागिने असा एकूण तीन लाख रुपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना तळोजा वसाहतीत घडली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. तळोजे फेज १ येथील ऑरेंज आर्केड इमारतीत राहणारे रश्मीन शराफत अली सुर्वे हे कुटुंबासह मुळ गावी गेले होते. यादरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांचे घराचा कडी कोयंडा तोडुन घरात प्रवेश करून ३० हजार रुपये रोख रक्कम, ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे ब्रेस्लेट, ६० हजार रुपये किमतीचे सोन्याची चैन, ८० हजार रुपये किंमतीचे अंदाजे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील सात एअर रिंग व झुमके, एक लाख रुपये किंमतीचे पाच अंगठया असा एकुण तीन लाख १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिरसाठ करीत आहेत.

# नवीन पनवेल येथे वर्षावास प्रारंभ सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बुध्दगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुध्द विहाराच्यावतीने आषाढी पौर्णिमेला दरवर्षीप्रमाणे 'वर्षावास प्रारंभ सोहळा' ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी यांच्या अध्यक्षतेखाली नवीन पनवेलमधील आम्रपाली बुध्द विहार याठिकाणी आयोजित करण्यात आला होता. तत्प्रसंगी बौध्द धम्माचे व आंबेडकरी विचारांचे अभ्यासक आयु. सुरेश सोनावणे (सरकारी निवृत्त अधिकारी)



यांचे धम्म प्रवचनही आयोजित करण्यात आले होते.धम्म प्रवचनात सुरेश सोनावणे यांनी तथागतांचे जीवन व बौध्द धम्मातील सर्व पौर्णिमेंचे महत्व तसेच आषाढी पौर्णिमा अर्थात वर्षावास प्रारंभ याविषयी सविस्तर माहिती देवून, सर्वांनी बंधुत्वाच्या, शांततेच्याच मार्गाने जावून आपल्या जीवनात सुख-समाधान मिळवावे, असे आवाहनही केले.

या कार्यक्रमास प्रमिला वानखेडे, नंदा शिंदे, नंदा ढेकळे, सुजित खंडिझोड, सुभाष कांबळे, मोहन कंठे, बापुसाहेब कांबळे, किसन ढेकळे, भास्कर शिंदे, प्रकाश सोनावले, सावळाराम वानखेडे, बाबूराव सोनावणे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक मिसाळ यांनी तर अमोल जाधव यांनी मानले.

# जेएनपीए बंदरात भारतीय मजदूर संघाची बैठक

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश, विदर्भ प्रदेश आणि गोवा या तीन प्रांताची बैठक जेएनपीए मध्ये शनिवार (दि. ८)पासून होत आहे. या बैठकीस भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय महामंत्री रवींद्र हिमते, केंदिय उपाध्यक्षा निता चोबे, क्षेत्रीय संघटन मंत्री सी व्ही राजेश, अखिल भारतीय पोर्ट ट्रस्टचे प्रभारी अण्णा धुमाळ व तीनही प्रांताचे अध्यक्ष, जनरल सेक्रेटरी, संघटन मंत्री, कोषाध्यक्ष, व केंद्रीय फेडरेशन चे प्रभारी




उपस्थित आहेत.

कार्यक्रमाच्या सुरवातीस भारतीय मजदुर संघ रायगड जिल्हा व जेएनपीटी कर्मचारी संघटनेच्या वतीने सर्व मान्यवरांचे शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उद्घाटन सत्रात अखिल भारतीय महामंत्री रवींद्र हिमते यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात संघ प्रचारक सुमंत आमसेकर यांचे मार्गदर्शन झाले. या बैठकीत भारतीय मजदूर संघाच्या तिन्ही प्रांताच्या कामाचा आढावा घेण्यात येणार आहे तसेच पुढील कामाचे नियोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय पोर्ट डॉक मजदूर महासंघाचे महामंत्री सुरेश पाटील व क्षेत्रीय संघटन मंत्री सी. व्ही. राजेश यांनी दिली.बैठक यशस्वी करण्यासाठी जेएनपीए मधील संघटनेचे सुरेश पाटील, सुधीर घरत, रवी पाटील, जनार्दन बंडा, जितेंद्र घरत, दिनेश साखरे, मंगेश पवार, केसरीनाथ म्हात्रे, नारायण धुमाळ, राजू म्हात्रे, रायगड जिल्हा ज्येष्ठ पदाधिकारी रमेश गोविलकर यांनी परिश्रम घेतले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात नृत्य स्पर्धा उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. ७) सांस्कृतिक विभागातर्फे नृत्य स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील व्यवस्थापन शिक्षण विभाग प्रमुख प्रा. रीत ठुले यांनी उपस्थित राहून परीक्षकाची भूमिका पार पाडली. या नृत्य स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी व



विद्यार्थिनीनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला व त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या नृत्य स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना या स्पर्धेसाठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे आयोजन प्रा. मीनल मांडवे (समन्वयक सांस्कृतिक समिती) यांनी केले तसेच डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. तनुजा सुमन व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# रामसे ब्रदर्सचे पिक्चर एन्जॉय करताना 'डरना मना है'

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

काही म्हणा, आपली चित्रपटसृष्टी म्हणजे, आपापल्या शक्तीनुसार लहान मोठी संस्थानेच. येथे राज कपूरच्या आर. के. फिल्म बॅनरखालील चित्रपटांची आपली एक कायमस्वरूपी ओळख आहे, तसाच मनमोहन देसाईंचा लॉस्ट ॲण्ड फाऊन्ड मसालेदार मनोरंजक पिक्चरची आपली एक धमाल होती.

याच चालीवर जायचं तर रामसे ब्रदर्स अर्थात रामसे बंधूंची आपली एक नावापासून पोस्टरपर्यंत 'डरावनी' फिल्मे अशीच एक ओळख होती. भलेही त्यांच्या त्या 'डरना जरुरी है' पिक्चर्सना समिक्षकांनी फारसं महत्त्व दिले नाही. क्वचित त्यांच्या एकाद्या पिक्चरचे परीक्षण आले असले. मुख्य प्रवाहातील चित्रपटात रामसेंच्या कधी भूत पिश्शाच्च तर कधी एकामागोमाग एक खून अशा चित्रपटांना स्थान मिळाले नसेल. चित्रपट अभ्यासक्रमात यांच्या चित्रपटावर लेक्चर्स नसतील. चित्रपट अभ्यासकांनी हसून हसून या अतिरंजित पिक्चर्सकडे दुर्लक्ष केले असेल. म्हणून काही त्यांची स्पेस नाकारता येत नाही. यशाची एक व्याख्या काय? स्वतःची ओळख निर्माण करणे. त्यात रामसे ब्रदर्स यशस्वी ठरले. मुंबईसारख्या ए श्रेणी केंद्रावर त्यांचे पिक्चर्स तीन आठवडे चालले तरी भारी असे. त्यांचा हाऊसफुल्ल पब्लिक बी (छोटी शहरे) आणि सी (ग्रामीण भाग) येथे पसरलेला आणि तोही हुकमी. रामसे ब्रदर्सचे पिक्चर्स थिएटरमध्ये बसल्या बसल्या घाबरत पाहायचे अशी एक मानसिकता होती. म्हटलं ना, रामसे ब्रदर्स मूव्हीजचं आपलं एक कल्चर होते. त्या सात रामसे बंधूंचे वडील एफ. यू. रामसे यांच्या १० जूलै या स्मृतिदिनानिमित्त हा 'घाबरायचं नाही' फोकस टाकतोय...

चित्रपटसृष्टीत बरीच उलथापालथ झालेल्या अशा ७० आणि ८०च्या दशकात हॉरर चित्रपटांच्या क्षेत्रात या सात भावांची मक्तेदारी होती. रामसे ब्रदर्सनी त्यांची प्रतिमा निर्माण केली, एक वेगळा ब्रँड निर्माण केला आणि मग हॉरर चित्रपट म्हणजे रामसे ब्रदर्स असे समीकरण कायमस्वरुपी घट्ट झाले. हे सात भाऊ म्हणजे, कुमार, केशू, तुलसी, किरण, श्याम, गंगू व अर्जुन. यांना आशा आणि कमला या दोन बहिणीही.

रामसे ब्रदर्सचे वडील एफ. यू. रामसे अर्थात फतेहचंद रामसिंघानी हे स्वातंत्र्यपूर्व काळात कराची आणि लाहोरमध्ये रेडिओचा व्यवसाय करायचे. इंग्रजांना त्याचे नाव उच्चारणे अवघड वाटले म्हणून ते त्याना रामसे म्हणत. फाळणीच्या वेळी ते कुटुंबासह मुंबईत आले आणि त्यांनी रेडिओ आणि कपड्यांचा व्यवसाय सुरू केला. फतेहचंदना आपल्या मुलांनीही असेच करावे असे वाटत नव्हते. त्यांच्या कुटुंबासाठी चित्रपट निर्मितीचे त्यांचे स्वप्न होते. तो काळही तसा समाजाच्या विविध स्तरातून चित्रपट निर्मितीत येण्यास उद्युक्त करणारा होता. सुरुवातीला त्यांनी काही चित्रपटांना वित्तपुरवठा करण्यास सुरुवात केली आणि लवकरच स्वतः चित्रपटांची निर्मिती करण्यास सुरुवात केली. फतेहचंद यांच्या असे लक्षात आले की चित्रपटाशी संबंधित तंत्रज्ञ (म्हणजे छायाचित्रण, संकलन वगैरे) आणि कामगार आपापले काम करतात आणि यामुळे चित्रपटाचे बजेटही वाढते. यानंतर त्यांनी ठरवले की ते यासाठी त्यांनी आपल्या मुलांना चित्रपट माध्यमाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर आपल्या कुटुंबाला चित्रपट निर्मितीचे बारकावे शिकवण्यासाठी त्यांनी प्रत्येकाला दोन महिन्यांसाठी काश्मीरला नेले आणि हाऊसबोट भाड्याने घेतली. तिथे त्यांनी चित्रपट निर्मितीशी संबंधित सर्व पैलू जसे दिग्दर्शन, ध्वनी, संकलन इत्यादी सात पुत्रांना शिकवण्यास सुरुवात केली. मुंबईत परतल्यानंतर त्यांनी आपल्या मुलांना व्यावहारिक ज्ञान देण्यासाठी नकली शान नावाचा सिंधी चित्रपट बनवण्यास सुरुवात केली. सात भावांनी मिळून हा चित्रपट बनवला. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार काम केले.

एफ. यू. रामसे यांनी एकेक चित्रपट निर्माण करीत वाटचाल सुरु केली. सर्वप्रथम जगदीश गौतम दिग्दर्शित 'शहीद ए आझम' (१९५४) हा देशभक्तीवरील चित्रपट निर्माण केला. त्यानंतर विशेष उल्लेखनीय गोष्ट, त्यांच्या दोन चित्रपटांचे दिग्दर्शन विश्राम बेडेकर यांनी केले. 'रुस्तम ए सोहराब' (६३) आणि 'एक नन्ही मुन्नी लडकी थी' (७०) हे ते चित्रपट होत. एक नन्ही मुन्नीचे विशेष त्यात पृथ्वीराज कपूर, सुरेन्द्रकुमार, नादिरा, हेलन, सज्ञन, जयंत इत्यादी. त्या दिवसांत मुमताज मेन स्ट्रीमकडे एस्टॅब्लिज होण्यात एकेक पाऊल पुढे टाकत होती आणि शत्रुघ्न सिन्हा लहान मोठ्या अशा मिळतील त्या भूमिका साकारत होता. या चित्रपटात हे दोघेही होते. एका दृश्यात एका वस्तू संग्रहालयात खंजीर चोरण्यासाठी पृथ्वीराज कपूर शैतानाचा मुखवटा आणि आठ इंच जुने कवच असलेला ड्रेस धारण करून मुमताजला सॉलीड घाबरवतो या दृश्याला थिएटरमध्ये मिळणाऱ्या रिस्पॉन्सवरून रामसे ब्रदर्सना जणू यशाचा फॉर्मुलाच सापडला.

श्याम व तुलसी हे रामसे ब्रदर्स दिग्दर्शनात उतरले. त्यांचा पहिला हॉरर पिक्चर 'दो गज जमीन के नीचे' (१९७२). हा चित्रपट अवघ्या साडेतीन लाखांत आणि पंचेचाळीस दिवसांत बनवला. तो चक्क यशस्वी ठरला आणि दक्षिण मध्य मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावरील (लॅमिन्टन रोड) रामसे ब्रदर्सचे ऑफिस चकाचक झाले. उजव्या बाजूला समोर अप्सरा थिएटर तर डाव्या बाजूस मिनर्व्हा थिएटर. माझ्यासारखे फिल्म दीवाने येथे पिक्चरला आलो-गेलो की रामसे ब्रदर्सच्या ऑफिसवर लावलेले खतरनाक मुद्रा असलेले त्यांच्या आगामी पिक्चर्सचे होर्डींग्स आणि खाली शो कार्ड्स हमखास बघणार. हे सवयीचे आणि आवडीचे कधी झाले ते समजलेच नाही. कालांतराने मी मीडियात आल्यावर येथेच केशू रामसेची मुलाखत घेतली. 'दो गज जमीन के नीचे'बद्दल एक किस्सा आहे. चित्रपटाचा एक सीन शूट करण्यासाठी रामसे ब्रदर्स त्यांच्या टीमसोबत स्मशानभूमीत पोहचले. दृश्यानुसार मैदानात खड्डा करावा लागला. चर्चच्या पुजाऱ्याची परवानगी घेऊन उत्खनन सुरु करण्यात आले. कोणताही वाद होऊ नये म्हणून स्थानिक नागरिकांची मदत घेऊन खड्डा खणण्याचे काम सुरू झाले. टीमने खूप विचार करून उत्खननाची जागा निवडली होती, मात्र प्रत्यक्षात उत्खननाच्या ठिकाणी एक मृतदेह बाहेर आला. भीतीने आरडाओरडा झाला आणि स्थानिक लोकांनी टीमचा घेराव सुरू केला. मोठ्या कष्टाने तेथून सगळे युनिट पळून गेले.

फतेहचंद रामसे यांची नात अलिशा कृपलानी यांनी 'घोस्ट्स इन अवर बॅकयार्ड' या पुस्तकात म्हटलयं की, १९८३ मध्ये 'पुराना मंदिर'चे शूटिंग संपल्यानंतर दिग्दर्शक श्याम रामसे काही दिवस शूटिंगच्या ठिकाणी (महाबळेश्वर) थांबले होते. काही दिवस राहिल्यानंतर ते त्यांच्या गाडीतून मुंबईला निघाले. तो रात्री एकटाच गाडी चालवत होता, तेव्हा त्याला वाटेत एक अतिशय सुंदर स्त्री लिफ्ट मागताना दिसली. त्याने गाडी थांबवली आणि ती महिला येऊन गाडीच्या पुढच्या सीटवर बसली. वाटेत श्यामने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण तिने प्रतिसाद दिला नाही. असं म्हणून श्यामची नजर त्या बाईच्या पायावर पडली. त्या महिलेचे वाकलेले पाय पाहून श्यामला धक्काच बसला. त्याने जोरात ब्रेक मारला. बाई गाडीचे गेट उघडून खाली उतरली आणि निघून गेली. श्यामने तिथून गाडी काढली आणि थेट मुंबई गाठली. नंतर 'वीराना' चित्रपटातही त्याने हाच क्रम दाखवला. अर्थात, ही सत्यकथा आहे की भूतकथा हे रामसे जाणे.

रामसे ब्रदर्सचे स्कोर कार्ड भन्नाट आहे. एक प्रकारची चित्रपट निर्मितीची फॅक्टरीच आणि म्हणूनच तोचतोचपणा येत गेला. प्रत्येक वेळी नवा प्लॉट, दोन तीन मर्डर, कधी भूताची गोष्ट, कधी आत्मा परमात्म्याचा मुक संचार यात मग थ्रील राहिले नाही. आणि त्यात भीती कमी व्हावी म्हणून की काय, मादक, मोहक नायिका व सहनायिका. हळूहळू रामसेबंधुंचा पिक्चर एन्जॉय करताना दचकून जायला व्हायचे ते गेलं आणि पडद्यावर जे चाललयं ते सहज पाहता येऊ लागले. तरी दोन दशके एकामागोमाग एक हॉरर फिल्म पडद्यावर आणत राहिले.

दो गज जमीन के नीचे (१९७२) पासून त्या 'भीतीच्या गोष्टी'ची सुरुवात झाली. कधी महाशक्तीशाली भुताची गोष्ट, कधी 'एक खून झाला तोच दुसरा' याचा रक्तपात. काहीही असलं तरी घाबरवून टाकणारे मुखवटे आणि थरारक म्युझिक ट्रॅक हे मोठेच आधारस्तंभ.

अंधेरा (७५), दरवाजा (७८), और कौन (७९), सबूत (८०), गेस्ट हाऊस (८०),दहशत (८१), सन्नाटा (८१), हॉटेल (८१), घुंगरू की आवाज (८१), पुराना मंदिर (८४), टेलिफोन (८५), सामरी- ३ऊ(८५), तहखाना (८६), ओम (८६), डाक बांगला (८७), वीराना (८८), पुरानी हवेली ( ८९), बंद दरवाजा (९०), इन्स्पेक्टर धनुष (९१), अजूबा कुदरत का (९१), द मॉन्स्टर (९४), तलाशी (९६). यात 'खोज ' ( ऋषि कपूर, किमी काटकर व डॅनी) हा सस्पेन्स थ्रीलर शेवटपर्यंत रंगला होता.

नव्वदच्या दशकात रामसे ब्रदर्सने त्यांचे चित्रपट दूरदर्शनवर दाखविण्याचा प्रयत्न केला, पण ए प्रमाणपत्र असल्याने त्याला परवानगी मिळाली नाही. यावर रामसे ब्रदर्सने चित्रपटाचे सॅटेलाइट हक्क झी टीव्हीला विकण्याचा प्रयत्न केला. झी टीव्हीचे संस्थापक सुभाष चंद्रा यांनी त्यांना झीसाठी एक हॉरर शो करण्याची ऑफर दिली. यासह झी हॉरर शोची मालिका सुरू झाली. भीतीचा प्रवास मोठ्या पडद्यापासून छोट्या पडद्यापर्यंत पोहचला. कोणाला घाबरवले तर कोणाला नाही. हॉरर चित्रपटांच्या धर्तीवर, अडीच तासांची कथा बनवली गेली आणि ती पाच आठवडे दाखवली गेली.

रामसेंच्या चित्रपटांसाठी महाबळेश्वर हे पसंतीचे ठिकाण असायचे. संपूर्ण कुटुंब बसने महाबळेश्वरला पोहोचायचे आणि अनारकली नावाच्या हॉटेलमध्ये राहायचे. चित्रपटांचे बजेट नियंत्रणात ठेवण्यासाठी चित्रपट निर्मितीशी संबंधित सर्व कामे संपूर्ण कुटुंब करत असत. त्यांनी त्यांच्या कुवतीनुसार कामाची वाटणी केली होती आणि त्यांनी बाहेरच्या कोणाचीही मदत घेतली नाही. कुमार रामसे-पटकथालेखन, गंगू रामसे-सिनेमॅटोग्राफी, किरण रामसे-ध्वनी विभाग, केशू रामसे-निर्मिती,अर्जुन रामसे-संकलन तर श्याम रामसे आणि तुलसी रामसे-दिग्दर्शन. कधी केशु रामसे दिग्दर्शन करे. भाई हो तो ऐसे असं कौतुकाने म्हणूयात. त्यांच्या कुटुंबातील महिला आणि मुलेही चित्रपट निर्मितीत सहकार्य करीत असत.

या यशोगाथेत, 'ज्वेल थीफ', 'तिसरी मंझिल', 'जॉनी मेरा नाम' या म्युझिकल रहस्यरंजक चित्रपटाचा दिग्दर्शक विजय आनंदने या रामसे ब्रदर्सच्या दिग्दर्शनात 'घुंगरु की आवाज 'मध्ये भूमिका साकारली, पण त्याच्याच दिग्दर्शनातील 'राम बलराम'च्या सेटवर त्याचे आणि रेखाचे खटके उडाल्याने त्याचा साईड इफेक्ट्स 'घुंगरु की आवाज' बोथट होण्यात झाला. 'रामसे ब्रदर्स फिल्म' हे एक स्वतंत्र कल्चर होते हे आपण मानतो ना? मग 'त्यांच्या चित्रपटांची भीती ती कशाला?' डरो मत!




# आरोग्याची वारी पंढरीच्या दारी!
## वारकऱ्यांची उपक्रमातून सेवा



पंढरपूर येथे आषाढी एकादशी सोहळ्यानिमित्त सार्वजनिक आरोग्य विभागाने वारकऱ्यांची आरोग्य तपासणीचा 'आरोग्याची वारी-पंढरीच्या दारी' उपक्रम राबविण्याचे ठरविले. त्यानुसार देहू-आळंदी ते पंढरपूरदरम्यान निघालेल्या पालखी मार्गावर सहा लाख ६४ हजार ६०७, तर पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिरांमध्ये पाच लाख ७७ अशा एकूण ११ लाख ६४ हजार ६८४ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार करण्यात आले.

'आरोग्याची वारी-पंढरीच्या दारी' या उपक्रमाची अंमलबजावणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या उपक्रमांतर्गत देहू-आळंदी ते पंढरपूर या पालखी मार्गावर आणि पंढरपूर येथे वारकऱ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी २७ ते २९ जून या कालावधीत वाखरी, गोपाळपूर व तीन रस्ता येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांच्या माध्यमातून आरोग्य विभागामार्फत विविध आरोग्य विषयक सेवा पुरविण्यात आल्या.

मंदिर परिसरामध्ये, वाळंवट ठिकाणी तीन व ६५ एकर येथे एक 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' आरोग्यमंत्री प्रा. डॉ. सावंत यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आले. आपला दवाखान्याच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १० खाटा क्षमतेच्या अतिदक्षता विभागासह व पंढरपूर शहरामध्ये १७ ठिकाणी अशा एकूण २० ठिकाणी मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली होती.

मुख्यमंत्री शिंदे यांनी शिबिराला भेट देऊन रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची माहिती घेतली व रुग्णांशी, डॉक्टर, कर्मचारी यांच्याशी संवादही साधला होता. रुग्णांना पुरवण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांबाबत समाधान व्यक्त केले होते.

देहू-आळंदी ते पंढरपूर या पालखी मार्गावर एकूण ६,६४,६०७ वारकऱ्यांना मोफत तपासणी व उपचार, प्रत्येकी दोन किलोमीटर अंतरावर २३३ तात्पुरत्या 'आपला दवाखाना' मार्फत मोफत आरोग्य सेवा, पालखी मार्गावर २४७ अशा एकूण १९४ आणि अत्यावश्यक रुग्ण सेवेसाठी १०८ एकूण ७५ रुग्णवाहिकांमार्फत १९,८५३ वारकऱ्यांना सेवा, ८४७ अत्यावश्यक वारकऱ्यांना योग्य वेळी उपचार व संदर्भ सेवा, पुणे परिमंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद स्तरावरुन पालखी बरोबर एकूण ९ आरोग्य पथके, एकूण १२४ आरोग्य दुतांमार्फत बाईक म्बुलन्सने आरोग्य सेवा, ३,५०० औषधी किटचे दिंडी प्रमुखांना मोफत किट वाटप, ७४६० हॉटेल्स मधील १०४५० कामगारांची आरोग्य तपासणी, पालखी मार्गावर १५६ टँकरद्वारे शुध्द पाणीपुरवठा, मुक्कामाच्या ठिकाणी धूर फवारणी, पाण्याच्या सर्व स्रोतांचे ओटी टेस्ट, जैव कचरा विल्हेवाट, तसेच चित्ररथांच्या माध्यमातून आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली आहे.

याचप्रमाणे पंढरपूर येथे तीन महाआरोग्य शिबिर, आपला दवाखाना (वाळवंट व इतर) येथे २७ ते ३० जूनदरम्यान पाच लाख ७७ लोकांची मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार, आरोग्य विभागामार्फत ३,७१८, खासगी वैद्यकीय व्यावसायिक ५०० व स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक १५०० असे एकूण ५,७१८ मनुष्यबळामार्फत मोफत आरोग्यसेवा, नेत्रविकार, हृदयरोग, किडनी, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, त्वचारोग, दंतरोग, संसर्गजन्य रोग (क्षयरोग, कुष्ठरोग), कर्करोगसारख्या रोगांवर मोफत उपचार, रुग्णांच्या मोफत ४० प्रकारच्या प्रयोगशाळा तपासण्या, प्रयोगशाळा तपासणीचा अहवाल रुग्णांच्या मोबाईलवर उपलब्ध करून देण्यात आला.

वारकऱ्यांच्या आवश्यकतेनुसार मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असून रुग्णांना अतिविशेषतज्ञ मार्फत ऑन्कोलॉजी, न्युरो सर्जरी, गॅस्ट्रोन्टेरॉलॉजी यासारख्या वैद्यकीय सेवा पुरविण्यात आल्या. शिबिरांमध्ये ७७,८५४ मोफत चष्मे वाटप व नेत्र तपासणी करण्यात आली. मोतिबिंदू झालेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. प्रत्येक शिबिराच्या ठिकाणी पाच बेड मनुष्यबळासह अतिदक्षता विभाग कार्यरत, त्यामध्ये १५४ रुग्णांना सेवा, अत्याधुनिक रेडिओ डायग्नॉस्टीक सुविधा, उपचार व आरोग्य तपासणीसाठी येणाऱ्या भाविकांना अल्पोपहार व चहाची व्यवस्था, मंदिर परिसरामध्ये आरोग्यदूतांमार्फत गर्दीच्या ठिकाणी बाईक ॲम्बुलन्स, शिबिराकरिता ईएमएस १०८च्या १५ रुग्णवाहिका, आषाढी वारीसाठी १५ रुग्णवाहिका मंदिर परिसरामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळासह तैनात ठेवण्यात आले होते.

**(साभार : महाराष्ट्र शासन)**



# विपश्यना
## अध्यात्मिक आणि भावनिक विश्वाची समृध्दता

आपण ज्या परिवारामध्ये जन्माला येतो त्याचप्रमाणे आपल्यावर सांप्रदायिक संस्कार होत असतात. जसे जसे आपण मोठे होतो, तशा आपल्या मान्यता आपल्या संप्रदायानुसार दृढ होत जातात. त्या परंपरांचे, विचारांचे अनेक लेप आपल्यावर चढवले जातात.

सध्याच्या परिस्थितीत आपण संप्रदाय म्हणजे धर्म आणि धर्म म्हणजेच संप्रदाय असे गृहीत धरून संप्रदाय आणि धर्म या दोन संज्ञांना समानार्थी संज्ञा केल्या आहेत. वास्तवित पाहता, भारताच्या हजारो वर्षांचा इतिहास दर्शवितो धर्म म्हणजे जे नैसर्गिक आहे. निसर्ग नियमांना धरुन आणि मानवाला त्याच्या प्रगतीसाठी सार्वजनिक दृष्टिने जे हितकारक आहे तो धर्म. जसे की, सत्धर्म (सत्यधर्म), शीलधर्म, अहिंसा धर्म. जसे पाण्याचा नैसर्गिक धर्म आहे. तहान भागवणे, अग्निचा धर्म तापणे अग्नि तापवणे. धर्म म्हणजे असे आचरण जे मानवतेला सार्वजनिकरित्या उपयोगी आहे, परंतु मानवाने या धर्माची सांगड सांप्रदायाशी घातली आणि संप्रदाय म्हणजेच धर्म असे रुपांतरण काळानुसार होत गेले.

आता, धर्म आणि संप्रदाय हे समजुन घेणे का अनिवार्य आहे हे थोडक्यात बघूया, मानवामध्ये काही विकार आहेत, जसे राग (लोभ/मोह), क्रोध, द्वेष, अहंकार इत्यादी. हे सगळे मानवी विकार सार्वजनिक आहेत, सांप्रदायिक नाहीत. जसे कि क्रोध हा क्रोध आहे, तो हिंदु क्रोध किंवा बौध्द क्रोध नाही. त्यामुळे जसे हे विकार सार्वजनिक आहेत तसाच त्यांचा इलाज ही सार्वजनिकच असायला हवा. हे सगळे विकार मनाच्या आणि शरीराच्या आतमध्ये आहेत. त्यामुळे या विकारांचा जर बरे करायचे असेल तर आपल्याला अंतर्मुखी होणे गरजेचे आहे. ध्यान ही कला भारतामध्ये हजारो वर्षांपासून अस्तित्वात आहे, पण 'ध्यान' या शुध्द कलेला आपण वेगवेगळ्या संप्रदायाशी जोडल्यामुळे आपण आपले चिंतन हे अंतर्मुख होण्यासाठी न करता एखादी प्रतिकृती, एखादा मंत्र, जप, प्रार्थना यासाठी करतो. 'ध्यान' हे शुध्द स्वरुपातच असावे. त्याच्याशी कोणत्याही सांप्रदायिक प्रतिकृती, शब्द प्रार्थना नसावी, कारण ध्यान करताना आपण स्वत:कडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे, तेव्हाच अंर्तमनातल्या ह्या विकारांची उदिरणा होईल.

'ध्यान' शुध्द स्वरूपातच करणे म्हणजे अंतर्मुख होऊन होऊन आपल्या श्वासांच्या आवागमानाकडे सृजन आणि सचेतन बुद्धीने आपले लक्ष केंद्रित करणे, श्वास आणि उच्छवास यांच्या अंतर्गत हालचाली आणि शरीराच्या धाराप्रवाहाकडे सहज, सजग आणि सचेतन बुध्दीने बघणे. हे शुध्द ध्यान करण्यासाठी आर्यमौन अत्यंत महत्वाचे असते. कायम बर्हिमुख असणारा मनुष्य या आर्यामौनाने अंतर्मुख होतो आणि त्याला स्वकेंद्रित ध्यान करता येत.

मनुष्य नेहमी ऐकत आला की, मन अस्थिर, चंचल आहे पण ध्यान करताना ह्याची स्वअनुभूती येते. अंतर्मुख होऊन ध्यान करताना अनेक व्याधी बाहेर येतात. आपलं मन आणि शरीरात चाललेल्या अनेक स्थूल आणि सुक्ष्म हालचालींचा जाणीव होते. जेव्हा चित्त एकाग्र करुन होणाऱ्या स्थुल आणि सूक्ष्म संवेदनांकडे साक्षी भावाने/दृष्टाभावाने बघता येईल तेव्हाच मानवाला अंर्तविकार मुक्त होता येईल.

मनाला निर्मळ आणि निर्विकार करण्याची शुद्ध साधना म्हणजे ध्यान. स्थुल जाणीवेकडून सुक्ष्म जाणीवेकडे जाऊन आपलं शरीर आणि मन जाणून घेण्याचा हा प्रवास जिकिरीचा आहे. श्वासांना बघता बघता सत्य कळेल आणि सत्याकडे बघता बघता परमसत्य कळेल.

हे लक्ष्य जरी कठीण वाटत असेले तरी आपलं मन आणि शरीर काही क्षण सचेतन, सजग, निर्मळ, निर्विकार अवस्थेत शुद्ध श्वास घेईल, हे शुद्ध श्वास म्हणजेच आपल्या ध्यानसाधनेच फलित आहे. जीवन जगण्याची कला अवगत करायची असेल तर स्वत:कडे सजगतेने, साक्षीभावाने बघणे शिकावे लागेल.

हॉर्वर्ड स्कूल ऑफ एज्युकेशन येथील मानशास्त्रज्ञ हॉर्वर्ड, गार्डनर यांच्या एका विवेचनात त्यांनी नोंदविले आहे की, आंतर वैयक्तिक बुध्दीमत्तेचा गाभा म्हणजे, इतर लोकांची मन:स्थिती, स्वभाव, प्रेरणा आणि इच्छा यांना योग्य रितीने प्रतिसाद देणे आणि योग्य-अयोग्यतेचे भान राखणे. आंतर वैयक्तिक बुध्दीमत्तेचे मर्म म्हणजे, स्वत:च्या भावनांना समजून घेणे आणि त्यांच्यात भेदभाव (चांगल्या वाईटाचा) करण्याची आणि वर्तनाला मार्ग दाखविण्यासाठी आपल्या भावनांचा उपयोग करणे.

आंतर वैयक्तिक बुध्दिमत्ता म्हणजे अंर्तमुखी होऊन आतल्या बाजुला वळणे. भारताची प्राचीन परंपरा किंवा पश्चात्यांनी केलेले संशोधन या दोनही दृष्टीकोनातून विचार केल्यास मानवाचे आध्यात्मिक आणि भावनिक विश्व समृद्ध करण्यासाठी मानवाला शुद्ध ध्यान साधनेचे म्हणजेच विपश्यनेकडे पुन्हा एकदा सातत्याने वळावे लागेल. हेच आजची परिस्थिती अधोरेखित करते.

**-जयश्री गीते,**
**उपकार्यकारी अभियंता, महापारेषण**

## निवडक

### माजी विद्यार्थिनीकडून छत्रीवाटप



**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील राजिप उतेखोलवाडी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना या शाळेची माजी विद्यार्थिनी वैभवी जाधव हिने छत्री वाटप करून शाळेविषयी आपले आदरयुक्त प्रेम व्यक्त केले. तिने केलेल्या या उपक्रमाबद्दल तिचे शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापिका, सर्व शिक्षकवर्ग, पालकवर्ग यांनी विशेष कौतुक केले आहे.
या कार्यक्रमास व्यवस्थापन समिती अध्यक्षा दिप्ती मुंढे, नगरसेविका रश्मी मुंढे, शिक्षण तज्ञ सुधाकर पालकर गुरुजी, सदस्या अंकिता जाधव, मुख्याध्यापिका शमिका अंबुर्ले, आदर्श शिक्षिका विनया जाधव, ज्येष्ठ शिक्षिका नंदिनी वाले, शिक्षिका स्नेहल उतेकर,पालकवर्ग आदी उपस्थित होते.

### मृतदेहाच्या नातेवाईकांचा शोध

**मोहोपाडा :** जुन्या मुंबई–पुणे महामार्गावर खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दोन महिन्यापूर्वी सापडलेल्या अनोळखी व्यक्तीच्या मृतदेहाची अद्याप ओळख पटली नसून पोलीस नातेवाईकांचा शोध घेत आहेत. खालापूर हद्दीत सागर हॉटेलजवळ रस्ता लगत मोरीत ४० ते ५० वयोगटातील व्यक्ती पडल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेतून त्या व्यक्तीला खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्र आणले होते, परंतु ही व्यक्ती उपचारादरम्यान मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. उंची अंदाजे पाच फूट आठ इंच, काळा सावळा रंग, जीन्स हाफ पॅन्ट, कमरेला स्वेटर गुंडाळलेल्या अवस्थेत आढळलेल्या व्यक्तीजवळ ओळखीचा कोणताही पुरावा न सापडल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध पोलीस घेत आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आले असून सहाय्यक फौजदार सुभाष म्हात्रे अधिक तपास करीत आहेत.



(छाया : बी. एस. कुलकर्णी)

**रसायनी : आपटा गावात एसटी बस स्थानकाच्या बाजूने रोड खोदून ठेवल्याने वाहतूक कोंडी होत आहे. लवकरात लवकर रस्त्याचे काम पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.**

# पावसाळी रानभाज्या होतायेत दुर्मीळ





**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळा आला की, पूर्वी खेड्यापाड्यातच नव्हे तर शहरातही रोजच्या जेवणात रानभाज्यांची रेलचेल असायची. गरीब कुटुंबे पावसाळाभर या रानभाज्यावरच बहुधा अवलंबून असत, मात्र ग्रामीण भागात वाढत्या बांधकामामुळे या रानभाज्या सध्या दुर्मीळ झाल्याचे चित्र असून, रानावनात दिसणाऱ्या रानभाज्याही जंगलाच्या ऱ्हासामुळे आता दिसेनाशा झाल्या आहेत.

दरवर्षी पावसाचे आगमन होत असल्यामुळे जंगलात अनेक प्रकारच्या रानभाज्या निर्माण होत असतात. ह्या रानभाज्यांमुळे आदिवासी यांना काही प्रमाणात रोजगारही मिळत असतो. शिवाय निसर्गाच्या मुळाशी अनेक प्रकारच्या रानभाज्या सहज निर्माण होत असल्याने या रानाभाज्यांचे महत्त्व दैनंदिन जीवनात अजूनही घटले नाही. यामुळे बाजरात तसेच रहदारीच्या ठिकाणी रानभाज्या दिसू लागल्या आहेत.

प्रामुख्याने यामध्ये कंटुली, आंबट बिंदुकली, कोळी, रानतेरि, लोथ, करडू, बोकर, कवळा, टाकला, भारंगी या भाज्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असल्यामुळे या भाज्यांना आयुर्वेदात चांगले महत्त्व आहे. यामुळे या रानभाज्या ग्रामीण तसेच शहरी भागात आवडीने खाल्ले जाते. रानभाज्या विकून घरचे भागवणे सोपे जाते तसेच दिवसाला दोनशे–तीनशे रुपये मिळत असल्याने घरातील खर्च भागविले जाते. तसेच या रानभाज्या रुचकर आणि चवदार असल्याने अनेक जण खरेदी करीत असतात, असे रान भाज्या विकत असलेल्या महिलांनी सांगितले.

दरम्यान, आदिवासी स्त्रिया रानावणात फिरून सदर भाज्या मिळवतात. या भाज्या विकून त्यांना रोजगार मिळत असून आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध होत आहे. काही दिवसांपूर्वी पन्नास ते साठ रुपयांना तीन जुड्या मिळत होत्या आता दहा रुपये प्रति जुडी मिळत आहे. पावसाळ्यात मिळणाऱ्या या भाज्या खरेदी करण्यासाठी प्रवासी व नागरिक आवर्जून थांबून भाज्या खरेदी करतात. या भाज्या खायला चवदार लागतात व बाधत नाहीत.

# कृषी सप्ताहात शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषि विभाग मार्फत संपूर्ण राज्यभरात कृषि संजीवनी सप्ताह आयोजित केला जातो. त्या अनुषंगाने खालापूर तालुक्यात तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत मौजे बोरगाव बु. येथील श्री सत्य साईबाबा मंदिर येथे कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमास कृषि पर्यवेक्षक महाडिक उपस्थित होते. महाडिक यांनी शेतकऱ्यांना आंतरपीक पद्धतीमध्ये भाजीपाला लागवड, कडधान्य पिकांची लागवड, तसेच महाडिबीटी अंतर्गत विविध योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी फळबाग लागवड इ. बाबत योग्य मार्गदर्शन केले.

गावचे कृषी सहायक फराटे यांनी आंतरराष्ट्रीय तृण धान्य वर्ष निमित्त आहारातील तृण धान्यांचे महत्त्व, तसेच तृणधान्य वर्गीय पिकांची लागवड इत्यादींबाबत मार्गदर्शन केले. तदनंतर शेतकऱ्यांना आत्मा अंतर्गत परसबागेतील भाजीपाला बियाण्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य अनंता चौधरी, आनु पिरकड व कृषी सहायक चौधरी यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपच्या हर घर संपर्क अभियानाला अंतोरे गावापासून प्रारंभ

**पेण : प्रतिनिधी**

भाजपच्या सरकारला नऊ वर्षे पुर्ण झाल्याच्या निमित्ताने संपुर्ण देशभरात हर घर संपर्क अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाला पेण येथील अंतोरे गावापासून प्रारंभ करण्यात आला.

आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील तसेच भाजपचे पेण विधानसभा संयोजक वैकुंठ पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रारंभ करण्यात आल्या या अभियानात शर्मिला वैकुंठ पाटील, माजी जि.प. सदस्या कौसल्या पाटील, वंदना म्हात्रे, सरिता पाटील, ज्योती लोके,कल्याणी कोळी, हिरा पाटील, मिनाज पठाण, संदेश पाटील, लक्ष्मी थळे, महिला ग्रामपंचायत सदस्या आणि भाजप कार्यकर्ते सामील झाले होते.

या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या देदिप्यमान कारकीर्दीचा आलेख जनतेसमोर मांडण्यात आला. या अभियानात अंतोरे गावासह आदी गावातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. या वेळी बोलताना शर्मिला वैकुंठ पाटील यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हर घर योजना या योजनेतील लाभ पेण तालुक्यातील महिलांना मिळावा यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असून अशा योजनांचा लाभ महिलांनी घ्यावा यासाठी ही योजना घरोघरी राबवत आहोत, असे मार्गदर्शन भारतीय जनता पक्षाचे महिला कार्यकर्त्या शर्मिला वैकुंठ पाटील यांनी सांगितले.





# प्रगतशील शेतकरी शैलेश चौगुले यांचा सत्कार

**श्रीवर्धन : बातमीदार**



श्रीवर्धन मधील प्रगतशील शेतकरी शैलेश चौगुले यांना रायगड प्रेस क्लब संलग्न श्रीवर्धन प्रेस क्लब कडून आदर्श शेतकरी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. शैलेश चौगुले व त्यांच्या पत्नी श्रद्धा चौगुले यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

शैलेश चौगुले हे भात शेती तर करतातच, परंतु त्यांनी फळबागांमध्येदेखील विविध प्रयोग केले आहेत. त्यांच्या फळबागेमध्ये आंब्याच्या १७ जाती लागवड केलेल्या पाहायला मिळतात. यावर्षी त्यामधील बहुतांश जातींना फळेदेखील आली होती. आंब्यासोबतच त्यांनी काजूच्यादेखील विविध जातींची लागवड आपल्या फळबागेमध्ये केली आहे. शैलेश चौगुले यांच्या फळबागेमध्ये ते वेगवेगळे प्रयोग करून पाहत असतात. त्यांनी या ठिकाणी स्ट्रॉबेरीची देखील लागवड केली होती व त्याचे देखील पीक उत्तम आले होते. तर त्यांनी आपल्या बागेत सफरचंदाची देखील लागवड केली आहे. फळबागे बरोबरच विविध फुलांच्या जाती देखील त्यांनी आपल्या बागेमध्ये जोपासल्या आहेत.

सत्कार समारंभावेळी श्रीवर्धन प्रेस क्लबचे अध्यक्ष संजय मांजरेकर, उपाध्यक्ष सावन तवसाळकर, संतोष रेळेकर, खजिनदार वैभव तोडणकर, सल्लागार आनंद जोशी, संतोष चौकर, सदस्य भारत चोगले, अबिद करदमे, प्रसाद नाझरे, संतोष शीलकर, विजय गिरी इत्यादी श्रीवर्धन प्रेस क्लबचे पत्रकार, साहिल कृषी सेवा केंद्रचे मालक इम्तीखार चरफरे, देवेंद्र भुसाणे, समीर केळकर, सुदेश केमनाईक आदी उपस्थित होते.

# चौल भोवाळे श्री दत्त टेकडीवरील मठात चोरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल भोवाळे श्री दत्त टेकडीवरील माई जानकीबाई हनुमंतराय मठात अज्ञातांची चोरी केल्याची फिर्याद रेवदंडा पोलिस ठाणे येथे नोंदविण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, चौल भोवाळे श्री दत्त टेकडीवरील माई जानकीबाई हनुमंतराय मठी आहे, या मठात ५ जुलै २०२३ सायकांळी साडेसहा ते ६ जुलै २०२३ रोजी रात्रीचे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयांने मठीत जेवणाच्या खोलीत ग्रील नसलेल्या खिडकीतून प्रवेश केला. या अज्ञात चोरटयांनी मठाचे भिंतीवर लावलेली कै. मधुकर पाटील यांची अंदाजे १२०० रूपये किमंतीची फोटोफ्रेम तसेच जेवणाचे लहान टोप, प्लष्टीक बंनर, सुचना फलक असा ४०० रूपये किमंतीचा ऐवजाची खोडसाळ चोरी केल्याची फिर्याद रेवदंडा पोलीस ठाणे येथे लिंबू–सरबत विक्रीचा व्यवसाय करणारे, चौल भगवती येथे राहणारे शिवकुमार मधुकर पाटील यांनी दिली आहे.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरटयांचे विरोधात भादविकलम ३८० प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास रेवदंडा पोलिस ठाण्याचे पोलिस इन्चार्ज राहुल अतिग्रे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.


## पाहीजेत

रूख्मिणीबाई प्रतिष्ठाण मुंबई संचलित विजय आर्मी स्कूल चिखले ता. पनवेल जि. रायगड या अनुदानित माध्य.व उच्च माध्य. निवासी सैनिकी शाळेसाठी खालील पदे भरावयाची आहेत. तरी पात्रता धारक इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज शै. व व्यवसायिक पात्रतेच्या कागदपत्राच्या सत्यप्रतीसह दि. २५/०७/२०२३ पर्यंत प्राचार्य विजय आर्मी स्कूल चिखले ता. पनवेल जि. रायगड. पिन ४१०२२१ या पत्यावर पाठवावे किंवा हस्ते पोहच करण्यात यावे.

| अ.क्र | पदाचे नांव | शै. व व्यावसायिक पात्रता | पदांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | वसतीगृह अधिक्षक | कोणत्याही शाखेचा पदवीधर (माजी सैनिकांना प्राध्यान्य) | १ | पुर्ण वेळ पुरुष |
| २) | वसतीगृह सहाय्यक | कोणत्याही शाखेचा पदवीधर किंवा १२ वी उत्तीर्ण | १ | पुर्ण वेळ पुरुष |

टिप- वरील पदे ही निश्चित मानधनावर भरले जातील

सौ.शिलाताई विजय पाटील
अध्यक्षा
रूख्मिणीबाई प्रतिष्ठान मुंबई

प्राचार्य
विजय आर्मी स्कूल, चिखले ता. पनवेल जि. रायगड.
मो.नं. ९८६७३०१७२५
८८३०६८०३६८/८७८८५५१०६३


# गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप





**रोहे : प्रतिनिधी**

खासदारसुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप डॉ. सी. डी. देशमुख कन्या शाळा येथे करण्यात आले. नगरपरीषद हद्दीतील शाळांतील विद्यार्थ्यांना ११११ वह्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, शहर अध्यक्ष अमित उकडे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, अहमद दर्जी, समीर सकपाळ, रवी चाळके, चंद्रकांत पार्टे, अखलाक नाडकर, अलिम मुमैरे, मजिद पठाण, मयुर पायगुडे, विनीत वाकडे, माज सवाल, निलेश शिर्के, स्वप्नील धनावडे, शाळेचे मुख्याध्यापक ईश्वर लाडे, धनवी मॅडम, क्लाबसर, दर्शन गुजर आदी उपस्थित होते.

या वेळी संतोष पोटफोडे यांनी अर्शिवाद व शुभेच्छा आपल्या नेत्यांच्या पाठीशी रहावे ही श्री धावीर महाराज चरणी प्रार्थना असे सांगितले. अमित उकडे यांनी सगळ्यांचे आशीर्वाद साहेबांच्या पाठीशी रहावे यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. तर अखलाक नाडकर यांनी रायगड जिल्ह्यासाठी पर्वणीच असते. या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम राबविले जातात, असे सांगितले. या सूत्रसंचालन अभार विद्या घोडींदे यांनी मानले.

# खोपोली येथे दुकाने फोडली

**खोपोली :** कर्जत खोपोली रेल्वे मार्ग लगतच्या डोलवली रेल्वे स्थानकालगत असणाऱ्या पाच ते सहा दुकाने फोडण्यात आली या बंद दुकानाचे शटर उचकण्यात आल्याचे दिसून आले.

खालापूर तालुक्यातील डोलवली रेल्वे स्थानकाजवळ विविध व्यवसाय करणारी दुकाने असून, या दोन डॉक्टरचे दवाखानेसुद्धा आहेत. रात्री अज्ञाताने सलग एका रांगेत असलेली पाच ते सहा दुकानाचे शटर उचकावट आतील वस्तू व रोख रकमेची चोरी केली. घटनास्थळी खालापूर पोलीस दाखल झाले. रोख, दागिने असे एकूण ५९ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेल्याचे फिर्यादींकडून सांगण्यात आले आहे. गुन्हा दाखल झाला असून तपास सुरू आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मुमुर्शी, ता. महाड, जि. रायगड येथिल खालील वर्णनाच्या मिळकती या आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे मुळ मालकांकडून कायम स्वरूपात खूषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा – वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तकार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तकार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

### मिळकतींने वर्णन

| सर्वे/ भूमापन नं. | एकूण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ७६८<br>७७० | ०–६५–००<br>०–९८–०० | ०.४७<br>०.५१ | श्री. मोहम्मद अफताब मलीक |

महाड
ता. ०९/०७/२०२३

सही/–
ॲड. कुणाल चंदणशिवे
महाड – रायगड
मो.नं. ९६६५६८५५४४



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कुसगांव, ता. महाड, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे मुळ मालकांकडून कायम स्वरूपात खूषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा – वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तकार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

### मिळकतींने वर्णन

| सर्वे/ भूमापन नं. | एकूण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ८५४ | ५–९९–०० | २.५० | श्रीम. सुलभा सुरेश तांबट उर्फ हेमलता काशिनाथ करडे |

महाड
ता. ०९/०७/२०२३

सही/–
ॲड. कुणाल चंदणशिवे
महाड – रायगड
मो.नं. ९६६५६८५५४४

# नवी मुंबईत प्लास्टिकविरोधी अभियान

## प्रतिबंधात्मक कारवाईत एक लाख ६० हजार दंडाची वसूली

### तब्बल ५३ किलोहून अधिक प्लास्टिक जप्त

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ्ता आणि पर्यावरणामध्ये प्लास्टिक हा अतिशय मोठा घातक असा अडथळा असून प्लास्टिकमुक्त नवी मुंबई हे उदिदष्ट नजरेसमोर ठेवून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांनी एकल प्लास्टिकचा वापर टाळावा याकरिता विविध मध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. या अनुषंगाने घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या नियंत्रणाखाली संपूर्ण नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्लास्टिक प्रतिबंधात्मक धडाकेबाज कारवाई करण्यात आली.



यामध्ये प्लास्टिक पिशव्या तसेच प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर अथवा साठा आढळलेली २८ दुकाने, आस्थापना यांच्यावर कारवाई करीत एक लाख ६० हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. तसेच ५३ किलो प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले.

या कारवाईत बेलापूर विभागात सहा दुकानदारांकडून ३० हजार दंडात्मक रक्कम व चार किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त, वाशी विभागात ११ दुकानदारांकडून ६५ हजार दंडात्मक रक्कम व १५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त, तुर्भे विभागात ५ दुकानदारांकडून २५ हजार दंडात्मक रक्कम व २२ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त आणि कोपरखैरणे विभागात सहा दुकानदारांकडून ४० हजार दंडात्मक रक्कम व दोन किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या साहित्यामध्ये प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे.

# एनआरआय कॉम्प्लेक्समध्ये स्वच्छतेचा जागर

## रहिवाशांशी सुसवांद साधणारी विशेष कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विभागात एनआरआय कॉम्प्लेक्स १ सारख्या बहुनिवासी निवासी संकुलाच्या सभागृहात तेथील रहिवाशांशी स्वच्छतेविषयी सुसवांद साधणारी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त तथा स्वच्छ भारत अभियानाचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे यांनी उपस्थितांना शून्य कचऱ्याचे महत्त्व विशद केले.

आपल्या घरातून जितका कमीत कमी कचरा घराबाहेर जाईल तितके स्वच्छतेचे मानांकन उंचावेल हे स्पष्ट करीत डॉ. बाबासाहेब राजळे यांनी थ्री आर संकल्पना उलगडून सांगितली. यामध्ये प्रत्येकाने शक्य होईल तितका कमी कचरा निर्माण करण्याकडे लक्ष देण्याचे सूचित करण्यात आले. त्याचप्रमाणे घरात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता कम्पोस्ट बास्केटचा वापर करून ओल्या कचऱ्याचे खतात रूपांतर करण्याची प्रक्रिया घराघरात केली जावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच निरूपयोगी सुका कचरा पुनर्वापरात आणावा अथवा त्यावर पुनर्प्रक्रिया करण्यासाठी दिला जावा, असेही त्यांनी सांगितले.

यासोबतच हजारो वर्षे नष्ट न होणारा प्लास्टिकचा भस्मासूर रोखण्यासाठी व आपले आणि आपल्या पुढील पिढ्यांचे भविष्य जपणुकीसाठी प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळावा, असे आवाहन केले. प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णपणे थांबवून कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करण्याचा निर्धार करावा आणि तो अंमलात आणावा असेही त्यांनी सांगितले.

प्रत्येक नागरिकाने कचरा हा निव्वळ कचरा नाही हे ओळखून थ्री आरच्या तत्वांची अंमलबजावणी करावी आणि ही माहिती केवळ आपल्यापुरती मर्यादित न ठेवता आपल्या शेजाऱ्यांना व संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला अशा प्रकारची कार्यवाही करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे त्यांनी सांगितले.

या वेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांनी आपले सहकारी मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनवणे, स्वच्छता अधिकारी विजय नाईक व सर्व स्वच्छता निरीक्षक तसेच एनआरआय कॉम्प्लेक्सच्या सचिव चित्रा चौधरी आणि उपस्थित असलेल्या सोसायटीतील नागरिक व कर्मचारी यांच्यासोबत स्वच्छतेची शपथ ग्रहण केली.




# पावसाळ्यात रस्त्यांकडे विशेष लक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळी कालावधीपूर्वी नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी नवी मुंबईतील सर्व प्राधिकरणांच्या तीन बैठका घेऊन पावसाळापूर्व कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे तसेच पावसाळी कालावधीत आवश्यक दक्षता घेण्याचे व परस्पर समन्वय राखण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने आयुक्तांनी भर पावसात नवी मुंबई महापालिका क्षेत्राचा पाहणी दौराही केला होता.

या दौऱ्यामध्ये काही ठिकाणी सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांबाबत ही कामे त्वरित थांबविण्याचे व हे रस्ते वाहतूकीसाठी खुले करण्याचे निर्देश आयुक्तांनी अभियांत्रिकी विभागास दिले होते. त्याचप्रमाणे रस्त्यावरील खड्डे दुरुस्तीबाबतही तत्पर कार्यवाहीचे निर्देशित केले होते.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील रस्ते सुस्थितीत रहावेत याकरिता नवी मुंबई महानगरपालिका आधीपासूनच दक्षतेने कार्यवाही करीत असून रस्ते दुरुस्तीचे वार्षिक देखभाल – दुरुस्ती कंत्राट करण्यात आले आहे व ते नियमितपणे सुरू आहे. त्यांच्यामार्फत रस्ते दुरूस्तीवर विशेष लक्ष दिले जात असून याकरिता विभागनिहाय आठ तसेच एमआयडीसी क्षेत्राकरिता दोन अशा एकूण १० कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांच्यामार्फत नियमितपणे रस्ते पाहणी करून त्याची दुरुस्ती करण्यात येत आहे.

## निवडक

### उरण महाविद्यालयाची स्वच्छता मोहीम



**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व ओएनजीसी यांच्या संयुक्त विद्यमाने पिरवाडी समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या स्वच्छता मोहिमेत. महाविद्यालयाचे विद्यार्थी व ओएनजीसी चे कर्मचारी सहभागी झाले होते. भारत स्वच्छ असेल तरच समृद्ध होईल या उद्देशाने या स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले गेले. संपूर्ण ओएनजीसी व नागाव परिसरातील समुद्रकिनारा स्वच्छ करण्यात आला. या माध्यमातून जवळपास दोन टन कचरा जमा करण्यात आला. डॉ. ए. आर. चव्हाण (आयक्यूएसी समन्वयक), डॉ. दत्ता हिंगमिरे, प्रा. अनुपमा कांबळे, विनिता तांडेल (एनएसएस कार्यक्रम अधिकारी) व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते.

### दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार



**पनवेल :** पनवेल पिपल्स ॲन्ड पेरेंट्स असोसिएशन संचालिक मायनॉरिटी उर्दु गर्ल्स हायस्कूल येथे संस्थेचे अध्यक्ष वाहीद हुसेन शेख यांच्या अध्यक्षतेखाली १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी वाहीद हुसेन शेख संस्थेचे सरचिटणीस, शब्बीर मुल्ला–उपाध्यक्ष, जुबेर पित्तू, बाबूभाई पटेल आदींच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी वाहीद हुसेन शेख, अजिम मुल्ला, जुबेर पित्तू, बाबूभाई पटेल यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. या वेळी नाजीम नालखंडे, हमीद धुरु, डॉ. अमीना कच्छी जहूर सैन, असलम पठाण, वहाब दाखवे, वरिष्ठ पत्रकार जुबेर फितरत, ज्येष्ठ पत्रकार वसीम पटेल, हनीफ कच्छी, मुख्याध्यापिका कुदसीया, जावीद मास्तर, आरीफ दळवी आदी उपस्थित होते.

# ३०९ अधिकारी, कर्मचाऱ्यांची बदली आणि पदस्थापना

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईचा नावलौकिक राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर होत असताना नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवासुविधा गुणवत्तापूर्ण असण्याकडे विशेष दिले जात आहे. याकामी कार्यरत असणाऱ्या महापालिका अधिकारी, कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींकडे नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांचे बारकाईने लक्ष असून कर्मचारीहिताचे विविध निर्णय घेतले जात आहेत.

या अनुषंगाने विविध विभागातील तब्बल १५० अधिकारी, कर्मचारी यांच्या पदोन्नतीनंतर त्यांना पदस्थापना देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे विभागांच्या कार्यप्रणालीमध्ये सूसुत्रता येण्याच्या दृष्टीने अनेक वर्ष एका विभागात कार्यरत असलेल्या १५९ अधिकारी, कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे तब्बल ३०९ अधिकारी, कर्मचारी यांच्या व्यापर स्वरूपातील बदलीचा व पदस्थापनेचा हा महत्वापूर्ण निर्णय महापालिकेच्या कामकाजाला गतीमानता देणारा आहे.

यामध्ये पदोन्नतीस पात्र ६ सहा. आयुक्त, १५ प्रशाकिय अधिकारी, ३० अधिक्षक अथवा वसूली अधिकारी, ९१ वरिष्ठ लिपिक अथवा कर निरीक्षक, एक लेखाधिकारी, सात सहाय्यक लेखाधिकारी अशा १५० इतक्या मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांना पदोन्नतीनंतरची पदस्थापना देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे बरीच वर्ष एका विभागात काम करणाऱ्या १५९ इतक्या मोठ्या प्रमाणावर बदल्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये पाच लेखाधिकारी, सात सहाय्यक लेखाधिकारी, १४ उपलेखापाल, एक सहाय्यक आयुक्त, तीन प्रशासकिय अधिकारी, तीन अधिक्षक अथवा वसूली अधिकारी, २५ वरिष्ठ लिपिक अथवा कर निरीक्षक, आणि १०१ लिपिक अशा १५९ कर्मचाऱ्यांची बदलीने पदस्थापना करण्यात आलेली आहे.

मागील आठवड्यात विविध संवर्गातील २४ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये आज १५९ जणांची बदलीने पदस्थापना करण्यात आलेली असून एकूण १८३ जणांच्या बदल्या झालेल्या आहेत.

# नवी मुंबईतील शिरवणे गावात वृक्षारोपण

## भाजप आणि श्री वाघोबा सेवा मंडळाचा उपक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष शिरवणे व श्री वाघोबा सेवा मंडळ शिरवणे गाव यांच्यावतीने तसेच श्री वाघोबा सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व भारतीय जनता पक्षाचे महामंत्री डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्री वाघोबा देवस्थान मौजे शिरवणे गाव येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी डॉ राजेश पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नरेश सुतार, मंडळाचे सचिव प्रभाकर ठाकूर, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष पंढरीनाथ पाटील, पांडुरंग सुतार, विजय नाईक, दीपेश पाटील, प्रदीप पाटील, दिलीप घरत, विनायक भोईर, संतोष घरत, संदेश घरत, स्वप्नील पाटील, इंद्रपाल भोईर, राजेंद्र वाळवे, संदीप उ. पाटील, बाबू मढवी, जयवंत उ. सुतार, दत्तात्रेय सुतार, कैलास सुतार, मध्वनाथ सुतार, दिलीप सुतार, प्रमोद सुतार, राकेश पाटील, राजन घरत, श्रीकांत नाईक, संदीप भ. पाटील, अविनाश वाव्हळ, सुनील भोईर, मंडळाचे युवा प्रतिनिधी ऋषिकेश काशिनाथ पाटील आदी उपस्थित होते.



वाघोबा सेवा मंडळाच्या वतीने मोठ्या प्रमाणात दरवर्षी वृक्षारोपण केले जाते. या कार्यात वनविभागाचे सहकार्य आम्हाला मिळते. इथे पाण्याची व्यवस्था नाही म्हणून आम्ही छोटासा बंधारा बांधला, ज्यात गावकऱ्यांनी सतत १०–१२ दिवस श्रमदान केले, परंतु येथे पाणी राहत नाही. पावसाळा येइपर्यंत खालून पाणी आणून झाडांना घालावे लागते, त्यांची निगा राखावी लागते. वृक्षारोपण दरवर्षी झाले पाहिजे. त्यातून सामाजिक जाण असल्याचे लक्षण दिसून येते. वाघोबाच्या प्रवेशद्वारावर वास्तविक काहीही संबंध नसताना रिझर्व्ह बँकेच्या वसाहतीचं नाव आहे. आमची मागणी आहे की, वाघोबाचे मेट्रो स्टेशन झाले पाहिजे. त्यामुळे या प्राचीन देवस्थानाची माहिती येणाऱ्या पिढीला होईल, असे भाजपचे महामंत्री डॉ. राजेश पाटील यांनी या वेळी सांगितले.

स्थानिक रहिवासी दिपेश पाटील यांनी सांगितले की, वाघोबा सेवा मंडळाच्या माध्यमातून आम्ही प्रचंड मेहनत घेत असतो. इथे वर्षभर काही ना काही उपक्रम सुरूच असतात. वृक्षारोपण करण्यामागचे कारण म्हणजे नवी मुंबईची लोकसंख्या वाढते आहे आणि ऑक्सिजनची पातळी कमी होत आहे. ती वाढवण्यासाठी सातत्याने आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्यात सिडको, वनविभागाचे सहकार्य आम्हाला मिळते.

# गॅस कनेक्शनची तपासणी सक्तीची

**पनवेल : वार्ताहर**

देशात अनेक ठिकाणी गॅस चा वापर आणि सुरक्षा याची माहिती नसल्याने गॅस धारकांचे अपघात घडले आहेत. या अपघाताचे प्रमाण शून्य आणण्यासाठी भारत पेट्रोलियमनी गॅस कनेक्शनची तपासणी सक्तीची केली आहे. गॅस कंपनीचे वितरक आपल्या प्रतिनिधींद्वारे हि तपासणी घरोघरी जाऊन करणार असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन भारत गॅसच्या वतीने करण्यात आले आहे.

देशात अनेक ठिकाणी गॅस कनेक्शन घेतल्यांनंतर ग्राहकांना सुरक्षा हॉज पाईप, सिलेंडर कसा ठेवावा, गॅस शेगडी कशी ठेवावी व वापरावी याची माहिती आणि सुरक्षा विषयी माहितीचा अभाव असल्याने अपघात घडत आहे हे अपघात रोखण्यासाठी आणि आपला आणि आपल्या कुटुंबाच्या जिवाच्या सुरक्षतेसाठी गॅस कनेक्शन चे तपासणी करण्यात येणार असून तशा सूचना भारत पेट्रोलियम दिलेल्या आहेत. या बाबत जिल्हाधिकारी रायगड पुरवठा शाखेच्या वतीने हि गॅस कनेक्शन ची तपासणी अनिर्वाय असल्याचे पत्रक संबंधित तालुका पुरवठा निरीक्षक आणि गॅस वितरण एजन्सीना दिले आहे.

या सुरक्षा अभियानांअंतर्गत गॅस धारकांनी आपल्या गॅस वितरण कंपनी कडून तपासणी करूंन घेणे बंधनकारक आहे. हि तपासणी केली नाही आणि काही अपघात झाल्यास त्याला गॅस वितरण कंपनी, जबाबदार राहणार नाही तसेच हि तपासणी न केलेल्या ग्राहकांचे गॅस कनेक्शन कंपनी कधी हि बंद करू शकते त्याचप्रमाणे सदर तपासणी पाच वर्षातून एकदा गॅस धारकांनी करणे अनिर्वार्य असून त्याकरिता नाममात्र शुल्क आकारण्यात येणार असून गॅस धारकांनी सहकार्य करावे, असे रायगड जिल्हा पुरवठा शाखेकडून सांगण्यात आले आहे.

# श्रामनेर आणि उपासक प्रशिक्षण शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षी निमित्त पुज्य भदन्त विमलकित्ती यांच्या माध्यमातुन श्रामणेर व उपासक प्रशिक्षित वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

श्रामनेर आणि उपासक वर्ग प्रबुध्द सेवा संघ जुईनगर नवी मुंबई यांच्या सहकार्याने जुईनगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे रविवार सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू आहेत.

पुज्य भदन्त विमलकित्ती गुणसिरी यांच्या मार्गदर्शनाखाली भिक्षु आणि उपासक प्रशिक्षित करण्याचे काम अविरत सुरु आहे. हे काम फक्त समाजातील श्रध्दावान दायकांच्या दानामुळेच शक्य झाले असून हे काम अधिक गतिमान करण्यासाठी समाजातील दानशूर दायकांनी प्रशिक्षण सेमिनरीला भेट देऊन तांदुळ, ज्वारी, बाजरी, नाचणी, डाळी, कडधान्ये, गोडेतेल, शेंगदाणे , आणि सेमिनरीच्या किचनमध्ये लागणारे साहित्य दान स्वरूपात देऊन आपली दान द्यावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी केले आहे.



# खैरवाडीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषदेच्या पनवेल तालुक्यातील प्राथमिक शाळा खैरवाडी येथील आदिवासी विद्यार्थ्यांना वह्या, पेन अशा शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

तालुकातील आदिवासी भागातील आजही काही प्रमाणात वह्या पेन, पेन्सिल, मिळत नाही. कोंडले येथील रवींद्र पाटील यांच्या वतीने प्राथमिक शाळा, खैरवाडी येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या आनंद व्यक्त केला.



# सानपाडा येथे विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप

**नवी मुंबई : बातमीदार**

शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त सानपाडा येथे शिवप्रेरणा प्रबोधन ट्रस्ट आणि शिवसेनेचे पदाधिकारी यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

शिवसेनेचे उपनेते विजय नाहटा यांच्या हस्ते या वह्यांचे वाटप करण्यात आले. १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला, अशी माहिती शिवप्रेरणा प्रबोधन ट्रस्टचे अध्यक्ष विसाजी लोके यांनी दिली. नवी मुंबई महापालिकेच्या श्री दत्त विद्या मंदिर या सानपाडा येथील शाळेतील विद्यार्थ्यांना या मोफत वह्यावाटप करण्यात आल्या.



शिवसेना वर्धापन दिनानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले आहेत. नुकतीच आषाढी एकादशी झाली, त्या वेळीही सानपाडा विभागात ४ ठिकाणी फराळ वाटप करण्यात आले. गरजू विद्यार्थ्यांना मोफत उत्पनाचे दाखले काढून देण्यात आले. नवी मुंबई महापालिकेच्या शालेय तसेच महाविद्यालयीन विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचे ऑनलाईन अर्ज भरून देण्यात आले, असे विविध प्रकारचे उपक्रम राबवण्यात आले आहेत, अशी माहिती विसाजी लोके यांनी या वेळी दिली.

विजय नाहटा यांनीही विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेऊन आई–वडील यांचे नाव उज्वल करण्याविषयी मार्गदर्शन केले. पालिकेच्या शाळेचे मुख्याध्यापक मंगल भोईर यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. अजित सावंत, गणेश पावगे, सूर्यकांत झेंडे, केदार तेंडुलकर आदी शिवसेनेचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

## निवडक



### संतोष कोळी ठरले आदर्श शेतकरी

**नागोठणे** : रायगड प्रेस क्लबच्या वतीने आदर्श शेतकरी पुरस्कार यावर्षी प्रगतशील शेतकरी संतोष कोळी यांना नागोठणे विभाग पत्रकार असोसिएशनचे मार्गदर्शक भाईसाहेब टके, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमन यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह तसेच बांबू व शेवग्याचे रोपटे या स्वरूपात शुक्रवारी (दि. ७) देण्यात आला. या वेळी रोहा पं. स. विस्तार अधिकारी एस. एन. गायकवाड, कृषी विस्तार अधिकारी आर. व्ही. लवटे, अशोक दांडेकर, नागोठणे पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, सचिव अनिल पवार, खजिनदार किशोर कदम, सहसचिव राजेंद्र जोशी, सदस्य चेतन टके, सचिन नेरपगार, ग्रामसेवक राकेश टेमघरे, पिगोंडे ग्रामसेवक विजय अहिरे, वनपाल उत्तम शिंदे, तलाठी गणेश विटेकर, वरवठणे तलाठी दिलिप खंदारे, अंकुश ताडकर, कर्मचारी दिलिप तेलंगे, दिनेश बावकर, नंदू बावकर उपस्थित होते.

### अभियंता शिवलिंग ऊळागड्डे सेवानिवृत्त

**महाड** : महाड सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये अधिकारी शिवलिंग ऊळागड्डे सेवानिवृत्त झाले आहेत. सार्वजनिक



बांधकाम विभागाच्या विभागीय कार्यालयामध्ये त्यांचा शुक्रवारी (दि. ७) आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिवलिंग ऊळागड्डे हे मूळचे घारोळा, ता. चाकुर, लातूर येथील आहेत. महाड तालुक्यातील विविध विकासकामांमध्ये एका अभियंता म्हणून त्यांनी महत्त्वाची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये त्यांचे विशेष कौतुक केले गेले.

### इंग्लिश स्कूल जावळीमध्ये कार्यक्रम

**माणगाव** : राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या सोमवारी (दि. १०) वाढदिवसानिमित्त तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेसतर्फे इंग्लिश स्कूल जावळी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तालुकाध्यक्ष सुभाष केकाणे यांनी दिली आहे. यादिवशी इंग्लिश स्कूल जावळी येथे मोफत छत्रीवाटप, खाऊवाटप तसेच इ. दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बास्केट बॉल क्रीडांगणाचा उद्घाटन सोहळा राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते रविवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले आहे.

# वर्षा सहलीसाठी फणसाड डॅमला पसंती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाला की, तरूणाईला वेध लागतात ते वर्षा सहलीचे. डोंगर कपाऱ्यांतून वाहणाऱ्या धबधब्यांखेरीज धरणातील धावणारे पाणी अंगावर घेण्यासाठी युवा मंडळी वर्षा सहलीचे प्लनिंग करतात. मुरूड तालुक्यातील फणसाड डॅमला तरूणाईच्या उत्साहाचा बहर वर्षा सहलीच्या निमित्ताने पहावयास मिळतो.

मुरूड तालुक्यातील बोर्ली येथून अंदाजे सहा ते सात किमी अंतरावरील वळणा वळणाच्या रस्ताने जाऊन भोईघर गावावरून पुढे काजूवाडी, बेलवाडी गावाच्या पुढे डोंगरात फणसाड अरण्यातील फणसाड डॅमवर जाता येते. पावसाळी पाण्याने तुंडूब भरलेले धरण तसेच आजूबाजूच्या डोंगर कपारीतील



(छाया : महेंद्र खैरे)

### सुरक्षा व सुविधा निर्माण करण्याची गरज

मनमोहक दृश्य, धरणावरून काजुवाडी तसेच बेलवाडी गावासह धरणामुळे परिसरातील हिरवीगार शेतीचे दृश्य भुरळ पाडते.

फणसाड धरणातून बोर्ली पंचक्रोशीतील २२ गावांना पाणीपुरवठा करते. पावसाळ्यात फणसाड डॅमला वर्षासहलीच्या निमित्ताने मोठी गर्दी होते, मात्र अनेक सुविधांचा अभाव येथे आढळतो, बाहेरून वर्षा सहलीसाठी येणाऱ्या मंडळीना रस्त्यावर कुठेही मार्गफलक नसल्याने चुकीच्या मार्गाने जात नाही ना, अशी शंका घेत पुढे जावे लागते. या परिसरात एकही दुकान अथवा पिण्याच्या पाण्याचीसुद्धा सोय नाही. बेलवाडी व काजूवाडी येथून फणसाड धरणाच्या डॅमकडे डोंगरातून कच्च्या रस्त्याने जावे लागते.

फणसाड धरणात पोहणाऱ्यांसाठी धोक्याचा इशारा देणारा कोणताही सूचनाफलक लावण्यात आलेला नाही. त्यामुळे अतिउत्साहात असलेल्या वर्षा प्रेमी मंडळीच्या जीवीतास निश्चित धोका असून पुढे दुर्दैवी घटना घडल्याचा संभव नाकारता येत नाही. फणसाड डॅमला वर्षासहलीच्या निमित्ताने तरूणाईची मोठी पसंती आहे. पावसाळ्यात दर शनिवार, रविवारी मोठी गर्दी पहावयास मिळते, परंतु तरूणाईच्या उत्साहाला सुरक्षेचे कवच फारच जरूरीचे आहे.

## विहूर पुलावरील रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी



**मुरूड : प्रतिनिधी**

मुंबई-मुरूड या मुख्य रस्त्याला जोडणारा विहूर पूल अत्यंत महत्त्वाचा आहेत, मात्र सद्यस्थितीत या पुलावरील रस्त्यावर पावसात खड्डे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी प्रवाशांमधून जोर धरीत आहे.

मुख्यालय अलिबाग व मुंबईलाला जोडणारा हा मुख्य रस्ता असतानासुद्धा सार्वजनिक बांधकाम खात्याने वेळीच दखल न घेतल्याने पहिल्याच पावसात खड्डे पडले आहेत. आज येथून चारचाकी व तीनचाकी व दुचाकी वाहनाला प्रवास करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

पुलाच्या सभोवताली कार्पेट करणे गरजेचे असतानादेखील सार्वजनिक बांधकाम खात्याने या कामाकडे दुर्लक्ष केले होते. त्याचप्रमाणे विहूर ते नवीन मजगाव रस्ता हासुद्धा अत्यंत खराब झाल्याने दुचाकी वाहनांना यांचा मोठा त्रास सहन करावा लगत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची मागणी जोर धरीत आहे.

## कारखान्यातील दूषित पाण्यामुळे कुंडलिका नदी प्रदूषित

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातून होत असलेले प्रदूषण काही प्रमाणात कमी झाले आहेत. काही कारखान्यांतून रासायनिक सांडपाणी गटारातून कुंडलिका नदीत सोडण्यात येत असल्याने नदीपात्र प्रदूषित होताना दिसत आहे.

धाटाव औद्योगिक क्षेत्रात रासायनिक कारखाने मोठ्या प्रमाणात व्यापलेले आहेत. या औद्योगिक क्षेत्रातील व कारखान्यातून बाहेर येणारे गटारे यातून काही प्रमाणात कुंडलिका नदीमध्ये सांडपाणी जात असल्याचे दिसून येते. त्यामुळे कुंडलिका नदी काही प्रमाणात प्रदूषित होताना दिसत आहे. यासाठी औद्योगिक क्षेत्रतील गटारे व रासायनिक कारखान्यातून बाहेर येणारे गटारे हे बंदिस्त करून थेट कारखान्यातील जलशुद्धीकरण केंद्र अथवा औद्योगिक क्षेत्रातील जलशुद्धीकरण केंद्राकडे वळवण्याची

**उपाययोजनांची आवश्यकता**





आवश्यकता आहे. त्यामुळे बाहेर पडणारा सांडपाणी यावर प्रक्रिया होऊन सोडल्यास प्रदूषण काही प्रमाणात कमी होईल. काही औद्योगिक क्षेत्रात प्रदूषणाची तपासणी त्याच ठिकाणी होताना दिसत आहे, परंतु धाटाव औद्योगिक क्षेत्रात नियमित प्रदूषणाचे तपासणी होताना दिसत नाही. त्यामुळे काही कारखानदार बिनधास्तपणे जल व वायू प्रदूषण करताना दिसत आहेत. सकाळी व सायंकाळीच्या सुमारास वायू प्रदूषण होताना दिसत आहे.

प्रदूषण मंडळाने कारखान्यात प्रदूषण झाल्यास त्यावर कारवाई करणे उचित आहेत. हे प्रदूषण रोखण्यासाठी उपयोजना करण्याचे हेही तेवढेच महत्त्वाचे आहे.



## निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांची सभा उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

निवृत्त पोलीस कल्याणकारी संस्थेची त्रैमासिक सभा संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कासार यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस मुख्यालय येथील जंजिरा सभागृहात उत्साहात झाली. सभेकरीता रायगड जिल्ह्यातून सुमारे ११० निवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेमध्ये निवृत्त पोलिसांच्या अडीअडचणी व प्रलंबित मागण्यांबाबत निवृत्त पोलीस कल्याणकारी संस्था रायगड व निवृत्त पोलीस कल्याणकारी शिखर संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासन व प्रशासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत असून त्या अनुषंगाने शासनाने ३० जून रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना १ जुलैची काल्पनिक वेतनवाढ देण्याबाबत घेतलेला निर्णय तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेची वाढवलेली व्याप्ती याबाबत सदस्यांना माहिती देण्यात आली.

सेवानिवृत्त पोलिसांच्या पेन्शन विषयक व तत्सम अडचणी जाणून घेऊन त्यावर संस्थेमार्फत पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील वर्षापासून संस्थेच्या सदस्याचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना संस्थेमार्फत पाच हजार रुपये आर्थिक मदत तातडीने देण्याचाही ठराव करण्यात आला आहे.

## शिरवलीच्या विद्यार्थ्यांनी बिजांची केली उधळण

**वृक्षारोपणासाठी राबविला उपक्रम**



**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल शिरवलीच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण जतनासाठी वृक्षारोपण मोहीम हाती घेऊन शालेय परिसर व रस्त्याच्या कडेला बीजांची उधळण करीत बीजारोपण केले.

विष्णु बुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र शिरवलीतर्फे देण्यात आलेल्या आंब्याचे १७५ बाठे (बिया) व करंजाच्या सुमारे २०० बियांचे रोपण शालेय परिसर व शिरवली-जिते या मार्गावर करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने शुक्रवारी (दि. ७) बीजारोपण मोहीम यशस्वी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी बीज रोपण करून त्याची निगा राखण्याची जबाबदारीसुद्धा घेतली असून हा परिसर हिरवा करण्याचा संकल्प केला आहे. या वेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## सीएफआय व बीएनवाय मेलनतर्फे शिक्षकांसाठी इंग्रजी सुधारणा कार्यशाळा

**पेण : प्रतिनिधी**

सीएफआय व बीएनवाय मेलन यांच्या विद्यमाने शिक्षकांसाठी इंग्रजी सुधारणा कार्यशाळेचे आयोजन शिक्षकांसाठी इंग्रजी सुधारणा कार्यशाळेचे आयोजन गुरुवारी (दि. ६) संस्थेच्या कार्यालयात करण्यात आले होते.

या कार्यशाळेसाठी सीएफआय संस्थेचे माजी चेअरपर्सन डॉ. नारायण हेगडे उपस्थित होते कार्यशाळेमध्ये त्यांनी शिक्षकांकडून इंग्रजी सुधारणा करिता तयार केलेली प्रश्नावली सोडवून घेऊन शिक्षकांना इंग्रजी विषयी संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले, तसेच या वेळी सीएफआय संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख यांनी देखील




(छाया : इजाज मनियार)

शिक्षकांना मोलाचे मार्गदर्शक होऊन मुलांच्या मनात इंग्रजी विषयाबद्दल असलेली भीती शिक्षकांनी कमी करावी, असे आवाहन शिक्षकांना केले.

कार्यक्रम सीएफआय संस्थेचे मुख्य कार्यकारी डॉ. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तमरित्या पार पडले.

## लायन्स क्लबतर्फे नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे लायन्स क्लबतर्फे नवनिर्वाचित अध्यक्ष पांडुरंग शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल न्यु पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ५) मोफत नेत्र



तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिरामध्ये ८२ रुग्णांचे ब्लडप्रेशर, डायबिटीस चेकअप तपासणी केली. त्यामध्ये मोतिबिंदूचे २१ पेशंट आढळले व त्यांना लगेच शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले. त्यापैकी १९ रुग्णांची शस्त्रक्रिया झाली असल्याचे एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी सांगितले.

या शिबिराच्या वेळी माजी अध्यक्ष डॉ. अनिल गिते, झोन चेअरपर्सन एमजेएफ लायन यशवंत चित्रे, डिस्ट्रीक्ट कॅबिनेटचे चेअरमन एमजेएफ लायन सुधाकर जवके, सेक्रेटरी एमजेएफ लायन विवेक सुभेकर, ट्रेझरर लायन संतोष शहासने, डायरेक्टर लायन सुजाता जवके, आरपीआय रोहा तालुकाध्यक्ष संतोष गायकवाड, अष्टविनायक पतसंस्थेचे उपाध्यक्ष महादेवसिंग परदेशी आदी उपस्थित होते.

आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे कॅम्प को-ऑर्डिनेटर प्रकाश पाटील व त्यांच्या टिमने रुग्णांची तपासणी केली.

## अमृत मोफत प्रवास अन् महिला सन्मान योजनांनी एसटी महामंडळाला नवसंजीवनी..!

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वय वर्ष ७५ व त्या पुढील वयाच्या नागरिकांसाठी एसटी महामंडळाच्या माध्यमातून अमृत मोफत प्रवास योजना आणि महिलांसाठी प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत असलेली महिला सन्मान अशा दोन स्वतंत्र योजना सुरू केल्या. या योजनांना महाराष्ट्रात अत्यंत उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या योजनांमुळे राज्य परिवहन महामंडळाला जणू नवसंजीवनीच मिळाली आहे. या लेखाच्या माध्यमातून रायगड विभागातील राज्य परिवहन महामंडळाच्या सद्यस्थितीचा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

रायगड विभागात एसटी महामंडळाला अमृत योजनेंतर्गत एप्रिल २०२३मध्ये एक लाख ५१ हजार ७०१ इतक्या ज्येष्ठ नागरिकांनी प्रवास केला. त्यातून ६२ लाख ८८ हजार ६३७ एवढे उत्पन्न मिळाले. मे २०२३ या महिन्यात एक लाख ५४ हजार ११५ इतक्या ज्येष्ठ नागरिकांनी प्रवास केला. यातून राज्य परिवहन महामंडळाच्या रायगड विभागाला ७१ लाख ५१ हजार २५६ एवढे



उत्पन्न मिळाले. जून २०२३मध्ये एक लाख ४७ हजार ९०९ इतक्या ज्येष्ठ नागरिकांनी प्रवास केला आणि त्यातून ६७ लाख ८७ हजार ५३७ रु. इतके उत्पन्न मिळाले आहे.

महिला सन्मान योजनेंतर्गत प्रवास भाड्यातील ५० टक्के सवलतीमुळे महिला प्रवाशांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून रायगड विभागात एप्रिल २०२३मध्ये १५ लाख ३२ हजार ८८० इतक्या महिला प्रवाशांनी या योजनेचा लाभ घेतला. यातून तीन कोटी १६ लाख ४८ हजार ६१३ रु. उत्पन्न मिळाले. मे २०२३ महिन्यामध्ये महिला प्रवाशांची संख्या वाढून ती १७ लाख ७० हजार ४५ झाली. त्यातून चार कोटी १७ लाख १७ हजार ४१० रु. उत्पन्न मिळाले. जून २०२३ महिन्यामध्ये १४ लाख ८५ हजार ६६ महिलांनी प्रवास केला त्यातून तीन कोटी २५ लाख ८६ हजार ५६२ रु. इतके उत्पन्न रायगड विभागाला मिळाल्याची माहिती पेण विभाग नियंत्रक दिपक घोडे यांनी दिली आहे.

समाजाचा एक महत्त्वाचा घटक असलेल्या ज्येष्ठांसाठीच्या अमृत मोफत प्रवास योजनेमुळे तसेच महिलांच्या सन्मानार्थ सुरू केलेल्या महिला सन्मान योजनेमुळे एसटी महामंडळाची प्रवासी वाहतूक बस पूर्ण क्षमतेने भरली जाते तसेच शासनाकडून मिळणाऱ्या परताव्यामुळे एसटी महामंडळाचे उत्पन्न दिवसेंदिवस वाढत आहे.

यातून एसटी महामंडळाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचाही उत्साह वृद्धींगत होत असून एसटी प्रवाशांना अधिकाधिक उत्तम सेवा देण्यासाठी त्यांनाही मानसिक बळ मिळत आहे. यातून एक सकारात्मक उर्जा निर्माण होऊन एसटी महामंडळ आणि प्रवासी यांच्यात जिव्हाळ्याचे नाते निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळत आहे.

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

## गेल कंपनीचे अलिबाग किनारी स्वच्छता अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारत सरकारचे निर्देशानुसार गेल (इंडिया) लिमिटेड, उसर कंपनीतर्फे ८ ते १५ जुलैदरम्यान स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याचाच एक भाग म्हणून शनिवारी (दि. ८) अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या अभियानात एक टनापेक्षा जास्त कचरा गोळा करून विल्हेवाट लावण्यात आली.

स्वच्छता पंधरवड्याचे दरम्यान गेल कंपनीचे आसपासचे परिसरातील नागरीकांमध्ये आपआपले घर गाव व गावचा परिसर स्वच्छ रहाण्यासाठी व स्चच्छतेबाबत आणि नागरिकांचे आरोग्याबाबत जागरुकता आण्ण्यासाठी विविध कार्ययक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

गेलचे मुख्य महाप्रबंधक व प्रभारी अधिकारी अनुप गुप्ता यांच्या मार्गदर्शनानुसार व अलिबाग



नगर परिषदच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांच्या सहकार्याने अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते.

या स्वच्छता अभियानात गेल कंपनीचे महाप्रबंधक विरेंद्र कुमार, महाप्रबंधक कासिवेले राजन, महाप्रबंधक प्रवीण लोखंडे, महाप्रबंधक जितिन सक्सेना व अनेक अधिकारी सहभागी झाले होते. या स्चच्छता अभियानात समुद्रकिनाऱ्यावर उपस्थित असलेल्या जवळजवळ २०० नागरिकांनी या स्वच्छता अभियानात सहभागी होऊन सुमारे एक टनपेक्षा जास्त कचरा गोळा केला.

# आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे दोन्ही क्रिकेट संघ होणार सहभागी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सर्वोच्च परिषदेची बैठक शुक्रवारी मुंबईत पार पडली. या बैठकीत बोर्डाने क्रिकेटशी संबंधित काही महत्त्वाचे निर्णय घेतले. बीसीसीआयने सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पुरुष आणि महिला संघांच्या सहभागास मान्यता दिली आहे. बीसीसीआयने एका नोटमध्ये म्हटले आहे की, व्यस्त आंतरराष्ट्रीय वेळापत्रक पाहता आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी संघाला क्षेत्ररक्षण करणे हे एक आव्हान असेल, परंतु देशासाठी खेळणेदेखील महत्त्वाचे आहे आणि आव्हानांवर मात करून भारतीय संघ दोन्ही प्रकारांमध्ये खेळेल.

२३ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत आशियाई खेळांचे आयोजन करण्यात येणार आहे. आशियाई खेळांच्या तारखा एकदिवसीय विश्वचषकाच्या (५ ऑक्टोबर-१९ नोव्हेंबर) तारखा




एकत्र येत आहेत, ज्यामुळे पुरुषांच्या स्पर्धेत द्वितीय श्रेणीचा भारतीय संघ चीनला जाईल तसेच महिला गटात पूर्ण ताकदीचा संघ पाठवला जाईल. रिपोर्टनुसार शिखर धवन आशियाई क्रीडा २०२२ मध्ये भारतीय पुरुष क्रिकेट संघाचे नेतृत्व करू शकतो. आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या स्पर्धा २८ सप्टेंबरपासून, तर महिलांच्या स्पर्धा १९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहेत.

गेल्या वर्षीच १० ते २५ सप्टेंबर या कालावधीत १९व्या आशियाई क्रीडा स्पर्धा होणार होत्या, मात्र चीनमध्ये कोरोनाचे प्रकरण वाढल्यानंतर हे खेळ पुढे ढकलण्यात आले होते.

आशियाई क्रीडा स्पर्धेत तिसऱ्यांदा क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. २०१४ आणि २०१४च्या गेम्समध्ये एक क्रिकेट इव्हेंटदेखील झाला होता, जिथे बीसीसीआयने पुरुष किंवा महिला संघ पाठवला नाही. २०१०च्या गेम्समध्ये बांगलादेश आणि पाकिस्तानने सुवर्णपदक जिंकले. २०१४मध्ये पुरुष गटात श्रीलंकेने आणि महिला गटात पाकिस्तानने सुवर्णपदक जिंकले होते.

## मुश्ताक अली ट्रॉफीतही आता 'इम्पॅक्ट प्लेयर'

बीसीसीआयने देशांतर्गत टी-२० स्पर्धा मुश्ताक अली ट्रॉफीबाबतही मोठा निर्णय घेतला आहे. आता इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)चा प्रसिद्ध 'इम्पॅक्ट प्लेयर' नियम १६ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये वापरला जाणार आहे. मार्गदर्शक तत्त्वांनुसार दोन्ही संघांना प्रत्येक सामन्यात एक 'इम्पॅक्ट प्लेअर' वापरण्याची परवानगी असेल, पण ते अनिवार्य नाही. शेवटच्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये 'इम्पॅक्ट प्लेयर' नियम लागू करण्यात आला होता, परंतु खेळाडूला १४व्या षटकाच्या आधी किंवा त्याआधी आणावे लागले आणि नाणेफेक करण्यापूर्वी त्याचे नाव घोषित करावे लागले. पुढच्या मोसमापासून ते बदलून आयपीएलप्रमाणेच वापरले जाईल. नाणेफेकपूर्वी प्लेइंग इलेव्हन व्यतिरिक्त चार पर्यायी खेळाडूंची नावेदेखील संघांना ठरवण्याची परवानगी असेल. प्रत्येक संघ या चार पर्यायी खेळाडूंपैकी एकच 'इम्पॅक्ट प्लेयर' म्हणून वापरू शकतो.

# थाई किक बॉक्सिंग स्पर्धेत रायगडला अजिंक्यपद

### ५१ सुवर्णपदक मिळवित चमकदार कामगिरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोलापूर सिंहगड इन्स्टिट्यूट येथे पहिली राज्यस्तरीय निवड चाचणी थाई किकबॉक्सिंग स्पर्धा अतिशय उत्साहात झाली. नागपूर, पनवेल, नाशिक, पिंपरी चिंचवड, रायगड, पुणे व सोलापूर जिल्ह्यांमधून स्पर्धक आले होते. स्पर्धेचे विजेतेपद ५१ सुवर्णपदकांसह रायगड जिल्ह्याने फटकाविले, तर उपविजेतेपद २७ सुवर्णपदकांसह पिंपरी चिंचवड खटकाविले. पुणे जिल्ह्याने २० सुवर्णपदकांसह तृतीय क्रमांक फटकावला.

स्पर्धेतील प्रो टायटल बेल्ट स्पर्धेत पुरुष गटात ५० किलोखालील वजन गटात रायगडचा दीपक पवार विजेता, ६० किलोवरील वजनगटात पनवेलचा साहिल सिनारे विजेता ठरला. विजय झालेल्या सर्व खेळाडूंची निवड गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे.

स्पर्धेचे उद्‌घाटन सिंहगड इन्स्टिट्यूटचे वाडेकर, महाराष्ट्र थाई बॉक्सिंगचे कार्याध्यक्ष संतोष म्हात्रे, सचिव निलेश भोसले, सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष हिंमत डेंगळे, विकास बडदे, अतुल गोडसे, चिंतामणी मोकल, मोहिन बागवान, परवेज शेख, प्रवीण वाघ, सचिन लिमसे, अनुज भोसले, वरद केनी, रोहित थळी, कार्तिक वाघ यांच्या हस्ते झाले.

विजेत्या खेळाडूंना ऑल इंडिया थाई किक बॉक्सिंग फेडरेशनचे अध्यक्ष संतोष म्हात्रे व युएसकेए इंडियाचे अध्यक्ष मंदार पनवेलकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमने टीम इंडियाला दिले आव्हान

**कराची : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक यंदा भारतात खेळवला जाणार आहे. १५ ऑक्टोबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हायव्होल्टेज सामन्याची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत, मात्र सध्या पाकिस्तानचा संघ सरकारच्या परवानगीची वाट पाहत आहे. त्याचवेळी पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमने आपण कोणत्याही संघासोबत कुठेही खेळण्यास तयार असल्याचे म्हटले आहे.

वास्तविक, बाबरचे हे वक्तव्य त्या प्रकरणानंतर आले आहे जेव्हा आयसीसी आणि बीसीसीआयने पाकिस्तान



क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) वर्ल्डकपचे स्थळ बदलण्याची मागणी फेटाळून लावली होती. पीसीबीने अफगाणिस्तान आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वर्ल्डकप सामन्यांचे ठिकाण बदलण्याची मागणी केली होती.

पीसीबी चेन्नईतील चेपॉक येथे अफगाणिस्तान आणि बंगळुरूमधील चिन्नास्वामी येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळू इच्छित नव्हते तसेच अहमदाबादमध्ये भारताविरुद्ध न खेळण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली, मात्र आयसीसीने या सर्व मागण्या फेटाळून लावल्या.

बाबर आझम म्हणाला, आम्ही कोणत्या संघाविरुद्ध कोणत्या मैदानावर खेळतो याकडे मला काही फरक पडत नाही. मला वाटते की, आम्ही केवळ भारताविरुद्धच खेळायला जात नाही, तर तिथे विश्वचषक खेळायला जात आहोत. आमचे लक्ष केवळ एका संघावर (भारत) नाही, नऊ इतर संघही आहेत. आणखी संघ ज्यांना आम्ही पराभूत करून अंतिम फेरी गाठू शकतो.

# राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत तन्मयला कलंत्रेला 'कांस्य'

**अकोला : प्रतिनिधी**

युथ राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा सिक्कीमची राजधानी गंगटोक येथे झाली. या स्पर्धेत अकोला क्रीडा प्रबोधनीचा बॉक्सर तन्मय कलंत्रे याने उत्कृष्ट प्रदर्शन करून कांस्यपदक प्राप्त करीत देशातून तिसरा क्रमांक पटकाविला.

अकोला क्रीडा प्रबोधनीच्या बॉक्सरांनी राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुयश मिळवित जिल्ह्याचे नाव चमकाविले आहे. त्यात तन्मय कलंत्रे हा देशातून तिसऱ्या क्रमांकाचा बॉक्सर ठरल्याने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. तन्मय कलंत्रे याने ४८ किलो वजन गटात हरियाणाच्या बॉक्सरला पटकनी देत कांस्यपदक मिळविले आहे.

यापूर्वी त्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिरासाठी आपले स्थान निश्चित केले होते तसेच त्याने काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र स्टेट चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक मिळविले आहे.

# भारत-अफगाणिस्तान मालिकेचा मुहूर्त ठरला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील वनडे मालिका होणार असल्याची माहिती दिली. ही वनडे मालिका आधी जून महिन्यात होणार होती, मात्र दोन्ही क्रिकेट बोर्डाच्या सहमतीने ही मालिका पुढे ढकलण्यात आली होती. पूर्वी ही तीन सामन्यांची मालिका २३ जून ते ३० जून या दरम्यान होणार होती. आता ही मालिका जानेवारी २०२४मध्ये होणार आहे.

जय शहा यांनी शुक्रवारी झालेल्या बीसीसीआयच्या




एपेक्स काऊन्सीलच्या बैठकीवेळी या दौऱ्याला हिरवा कंदील दाखवला. शहा यांनी देशातील द्विपक्षीय सामन्यांसाठी नव्या माध्यम हक्क करार प्रक्रिया ऑगस्टच्या अखेरपर्यंत पूर्ण करणार असल्याची देखील घोषणा केली. हा करार पुढच्या चार वर्षासाठी असणार आहे.

जय शहा म्हणाले की, बीसीसीआयची नवीन माध्यम हक्क डील ही ऑगस्टच्या शेवटीपर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर आठ सामन्यांची ऑस्ट्रेलिया मालिका सुरू होईल. यात तीन वनडे सामने हे वर्ल्डकपपूर्वी आणि पाच टी २० सामने हे वर्ल्डकप नंतर होणार आहेत. बीसीसीआय एशियन गेम्स २०२३पूर्वी भारतीय वरिष्ठ महिला संघासाठीचा संपूर्ण कोचिंग स्टाफ हा निवडला जाईल. बीसीसीआय चीनमध्ये होणाऱ्या एशियन गेम्स २०२३मध्ये भारताचा पुरूष आणि महिला क्रिकेट संघ पाठवणार आहे.

शहा म्हणाले, आम्ही एशियन गेम्समध्ये सहभागी होणर आहे. एपेक्स काऊन्सीलने याबाबत परवानगी दिली असून आमचा पुरूष आणि महिला संघ चीनमधील एशियन गेम्समध्ये खेळणार आहे.

# कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यासाठी संघाची घोषणा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाला वेस्ट इंडिजविरुद्ध १२ जुलै ते १३ ऑगस्टपर्यंत दोन कसोटी सामने, तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामने खेळायचे आहेत. टीम इंडियाने शेवटचा वेस्ट इंडिजचा २०१९मध्ये सर्व फॉरमॅटच्या सामन्यांसाठी दौरा केला होता आणि प्रत्येक फॉरमॅटमध्ये मालिका जिंकली होती.

गेल्या वर्षी तेथे एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांची मालिका खेळली आणि दोन्ही जिंकल्या. या वेळी दौऱ्याची सुरुवात कसोटी मालिकेने होणार आहे. कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यासाठी वेस्ट इंडिजने आपला संघ जाहीर केला आहे.

क्रिकेट वेस्ट इंडिजच्या निवड समितीने भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यासाठी संघाची घोषणा केली आहे. १२ ते १६ जुलै दरम्यान खेळल्या जाणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी पॅनेलने १३ सदस्यीय संघाची निवड केली तर दोन राखीव खेळाडूंची नावे दिली आहेत. डावखुरा फलंदाज कर्क मॅकेन्झीचा प्रथमच संघात समावेश करण्यात आला आहे, तर डावखुरा ॲलीक अथानेज हा संघातील अन्य अनकॅप्ड खेळाडू आहे.

नोव्हेंबर २०२१मध्ये शेवटची कसोटी खेळणारा अष्टपैलू रहकीम कॉर्नवॉल आणि डावखुरा फिरकी गोलंदाज जोमेल वॅरिकन संघात परतले आहेत.

भारत-वेस्ट इंडीज २०२३-२०२५ खउउ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेने सुरू होईल. डोमिनिका येथील विंडसर पार्क येथे १२ ते १६ जुलै दरम्यान पहिली कसोटी खेळली जाणार आहे. त्याच वेळी दुसरी कसोटी २० ते २४ जुलै दरम्यान त्रिनिदादच्या क्वीन्स पार्क ओव्हलवर खेळवली जाईल. दुसरा कसोटी सामना भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात खेळला जाणारा १०० वा कसोटी सामना असेल.

**पहिल्या कसोटी सामन्यासाठी वेस्ट इंडिज संघ : क्रेग ब्रॅथवेट (कर्णधार), जर्मेन ब्लॅकवुड (उपकर्णधार), अलिक अथानाज, टॅगेनरिन चंद्रपॉल, रहकीम कॉर्नवॉल, जोशुआ दा सिल्वा, शॅनन गॅब्रिएल, जेसन होल्डर, अल्झारी जोसेफ, किर्क मॅकेन्झी, रेमन रेफर, केमार रोच, जोमेल वॉरकेन.**

**वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघ : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, ऋतुराज गायकवाड, विराट कोहली, यशस्वी जैस्वाल, अजिंक्य रहाणे (उपकर्णधार), केएस भरत (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, शार्दुल ठाकूर, पटेल, रवींद्र जडेजा. मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, जयदेव उनाडकट आणि नवदीप सैनी.**

# राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट स्पर्धा सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

१३ वी वरिष्ठ गटातील राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेला शनिवार(दि. ८)पासून महाराष्ट्र क्राइस्ट अकॅडमी, सेक्टर-२३ कोपरखैरणे, नवी मुंबई येथे सुरू झाली आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील २१ जिल्हयातील २१५ खेळाडू सहभागी झाले आहेत.

स्पर्धेचे उद्‌घाटन इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले, खजिनदार मुकेश सोनवाणे, डायरेक्टर नवी मुंबई को. ऑप.बँक आनंद कचरे, मॅनेजिंग डायरेक्टर साई होली फेथ स्कूल कोपरखैरणे साधना सिंह, मुख्याध्यापक स्मिता शर्मा, नवी मुंबई महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनच्या अध्यक्ष सुरेखा येवले, पौर्णिमा तेली, साहेबराव ओहाळ, संकेत धामंडे, तृप्ती बनसोडे, अरविंद शिर्के, अनुज सरनाईक, सूर्यकांत कचरे, मिथुन जोशी, विवेक सिंग, संकेत पाटील यांच्या उपस्थितीत झाले.

# तमिम इक्बालच्या निवृत्तीनंतर लिटन दास बांगलादेशचा वनडे कर्णधार

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेश क्रिकेट संघाचा फलंदाज आणि एकदिवसीय संघाचा कर्णधार तमिम इक्बाल याने गुरुवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. अफगाणिस्तान आणि बांगलादेश यांच्यात खेळल्या जात असलेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिल्या सामन्यानंतर तमीम इक्बालने निवृत्तीची घोषणा केली. त्यानंतर एका दिवसानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आता एकदिवसीय संघाची कमान लिटन दासकडे सोपवली आहे. दास आता अफगाणिस्तानविरुद्धच्या उर्वरित दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये बांगलादेश संघाचे नेतृत्व करेल.

लिटन हा बांगलादेशचा अनुभवी खेळाडू असून त्याने यापूर्वी कर्णधारपद भूषवले आहे. लिटन हा कसोटी सामन्यांचा कर्णधार आहे. तमिमच्या निवृत्तीच्या घोषणेनंतरच लिटनकडे वनडेचे कर्णधारपद सोपवण्यात आले. तमिमने गुरुवारी पत्रकार परिषदेत राजीनामा जाहीर केला. यादरम्यान तो भावूक झाला होता. तमिमच्या राजीनाम्यानंतर लिटन आता अफगाणिस्तानविरुद्धच्या उर्वरित दोन सामन्यांचे नेतृत्व करणार आहे.

संघाचे कर्णधारपद मिळाल्यानंतर लिटन दास म्हणाला की, आम्हाला तमीम इक्बालची खूप आठवण येईल. जर मी जखमी झालो तर संघाला माझी तितकीच उणीव भासणार नाही जितकी आम्हाला त्याची उणीव भासेल. हे क्रिकेट आहे आणि आपल्याला पुढे जायचे आहे. त्याचबरोबर युवा खेळाडू संघात येत आहेत. कधीतरी आपल्यालाही निघावे लागेल आणि सध्या तमीम आपल्यासोबत नाही. त्यामुळे त्याच्याबद्दल जास्त बोलणे योग्य नाही. तमिमने घेतलेला निर्णय आम्हा सर्वांसाठी अत्यंत धक्कादायक आहे. तो असा निर्णय घेईल, अशी अपेक्षा एकाही खेळाडूला नव्हती.

बांगलादेशने तीन एकदिवसीय मालिकेतील पराभवाने सुरुवात केली. डकवर्थ लुईस नियमानुसार पहिल्या सामन्यात अफगाणिस्तानने १७ धावांनी पराभूत केले होते. आता या मालिकेतील दोन सामने बाकी आहेत. दुसरा सामना ८ जुलैला, तर तिसरा सामना ११ जुलैला होणार आहे.

# पॅरा नेमबाजी वर्ल्डकपमध्ये स्वरूप उन्हाळकरला 'सुवर्ण'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रोएशिया येथे सुरू असलेल्या पॅरा नेमबाजी वर्ल्डकप स्पर्धेत कोल्हापूरच्या स्वरूप उन्हाळकरने भारताला सुवर्णपदक जिंकून दिले. या स्पर्धेतील भारताचे हे पहिलेच सुवर्ण आणि स्वरूपचे पहिले आंतरराष्ट्रीय पदक ठरले. स्वरूपने आर १ पुरुष १० मीटर रायफल स्टँडिंग एसएच १ प्रकारात २४५.९ गुणांची कमाई करून सुवर्णपदकावर नाव कोरले.



स्वरूपने हंगेरी व स्लोव्हाकियाच्या नेमबाजांवर सरशी साधली. हंगेरीचा रेस्किकने २४५ गुण, तर स्लोव्हाकियाचा मॅलेनोने २२३.७ गुणांची कमाई करून अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक निश्चित केले.

कोल्हापूरच्या ३६ वर्षीय स्वरूपने टोकियो पॅरिलिम्पिक स्पर्धेत सहभाग घेतला होता, परंतु त्याला २०३.९ गुणांसह चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. थोडक्यात त्याचे पदक हुकले. २००९मध्ये त्याने नेमबाजीला सुरुवात केली आणि २०१२पासून स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.

भारतीय संघ २०२३मध्ये चँग्वॉन येथे झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेत सहभागी झाला होता आणि तीन रौप्य व पाच कांस्य अशा आठ पदकांची कमाई केली होती. संघाला तेव्हा सातव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com